आपला आवाज आपली शक्ती

# जनशक्ति

जळगाव येथून प्रकाशित होणारे निष्पक्ष, निर्भीड दैनिक

epaper.janashakti.in » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ » वर्ष : ७३ » अंक : २२३ | बुधवार, २० मे २०२६ » जळगाव/नाशिक/धुळे/नंदुरबार » पाने ६ » किंमत : २ रुपये

**सुविचार**

स्वप्ने पाहणार्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पिछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.

- स्वामी विवेकानंद

**अंतरंग**

- जळगाव जिल्हा - बोदवड पंचायत समिती...
- दृष्टीकोन - युद्धाचे परिणाम
- जीवनशक्ती - त्वचेची काळजी कशी घ्याल वयोमानानुसार
- जनशक्ति विशेष - सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी...

## शॉर्ट न्यूज

### जळगाव बाजार समिती सभापतीपदी लकी टेलर

**जळगाव ।** जळगाव शहरांमधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदासाठी पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे ठराव दाखल झाला होता. मात्र, त्यापूर्वीच राजीनामा दिल्यामुळे आज (दि.१८) जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी अखेर लक्ष्मण गंगाराम पाटील उर्फ लकी टेलर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. गेल्या अनेक दिवसांपासून उत्सुकता लागून असलेल्या आल्याने ते अखेर लकी ठरल्याची चर्चा सुरू होती. जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत महायुतीला निर्णायक बहुमत असले तरी सभापती निवडीत मोठे नाट्य घडले आहे. याआधी शामकांत सोनवणे यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणून सुनील महाजन हे बाजार समिती सभापती बनले होते. तर, अवघ्या सहा-सात महिन्यात सुनील महाजन यांच्या विरोधात संचालकांनी मोट आवळून अविश्वास प्रस्ताव सादर केला होता.

### औषध विक्रेत्यांचा आज देशव्यापी बंद

**मुंबई ।** ऑनलाईन औषध विक्री बंद करा, कॉर्पोरेट्सद्वारे अव्यावसायिक सवलत देणे बंद करा आणि बनावट औषध विक्रीला आळा घालावा या मागणीसाठी ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॅड ड्रगिस्टने २० मे रोजी एक दिवसीय देशव्यापी बंद पुकारला आहे. यामुळे देशातील सर्व औषध विक्रेते आपले दुकान बंद ठेवणार आहेत. औषध विक्रेत्यांनी पुकारलेल्या या बंददरम्यान नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत व अखंडपणे उपलब्ध व्हावा यासाठी 'एफडीए'ने आवश्यक उपाययोजना करीत सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत.

# नसरापूर अत्याचार : चौदा दिवसात आरोपपत्र दाखल

## २१ मेपासून पुणे विशेष न्यायालयात दररोज सुनावणी

। पुणे ।

नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध चौदा दिवसात आरोपपत्र दाखल करण्यात आल्यानंतर आता या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहेत. या प्रकरणाची सुनावणी येत्या २१ मेपासून पुण्यातील विशेष न्यायालयात दररोज होणार आहे.

महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्यचाार करुन तिचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेचे संतप्त पडसादपुणे शहर, तसेच राज्यात उमटले होते. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करुन भीमराव कांबळे (वय ६५) याला अटक केली. गुन्हा घडल्यानंतर पोलिसंनी सखोल तपास करुन आरोपी कांबळे याच्याविरुद्ध विशेष न्यायालयात ११०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्र न्यायवैद्यक अहवाल, सीसीटीव्ही चित्रीकरण, तांत्रिक पुरावे, तसेच शवविच्छेदन अहवाल, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब जोडण्यात आले आहेत. नसरापूर अत्याचार प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेऊन आरोपीला कठोर शिक्षा करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

'नसरापूर अत्याचार प्रकरण संवेदनशील आहे. या प्रकरणाची सुनावणी येत्या २१ मेपासून दररोज घेण्यात येणार आहे. खटला जलदगतीने चालविण्यात येणार आहे.' अशी माहिती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी दिली. या प्रकरणात ड. मिसर यांना ड. सुरेश गायकवाड, ड. प्रमेश शिगणे हे सहाय करणार आहेत. ड. मिसर हे २००० पासून सरकारी वकील म्हणून काम पाहत आहेत. विविध गंभीर गुह्यांच्या खटल्यात त्यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे.



### सुनावणी 'इन कॅमेरा'?

» नसरापूर अत्याचार प्रकरणाची सुनावणी दररोज होणार आहे. ही सुनावणी बंद खोलीआड (इन कॅमेरा) होणार आहे. पीडित बालिकेच्या कुटुंबीयांची ओळख न पटू देणे, तसेच संवेदनशील बाबी विचारात घेऊन न्यायालयाकडून आवश्यक ती काळजी घेण्यात येणार आहे. आरोपीला दररोज कडक बंदोबस्तात न्यायालयात हजर केले जाणार आहे. न्यायालयीन सुनावणी जलदगतीने पूर्ण करुन आरोपीला कठो शिक्षा होण्यासाठी शासन, तसेच पोलीस प्रयत्नशील आहेत. पोलिसांनी तपास करुन अवध्या चौदा दिवसात आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले आहेत. या प्रकरणाची न्यायालयीन सुनावणी जलदगतीने घेऊन आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी शासन आणि पोलीस प्रयत्नशील आहेत. पीडीत बालिकेच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देणे, तसेच समाजात कठोर संदेश देण्यासाठी या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी दिली.

# पेट्रोल, डिझेलच्या किमती पुन्हा १३ ते १७ रुपयांनी वाढणार

**मुंबई ।** सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागण्याची शक्यता आहे. नुकतीच झालेली ३ ते ४ रुपयांची इंधन दरवाढ पुरेशी नसून, ऑइल कंपन्यांचा तोटा भरून काढण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत पुन्हा एकदा १३ ते १७ रुपयांची वाढ करावी लागेल, असा अंदाज 'कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीज' या आघाडीच्या ब्रोकरेज संस्थेने व्यक्त केला आहे.



पश्चिम आशियातील वाढता संघर्ष आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारतासमोरील आर्थिक आव्हाने कमालीची वाढली आहेत. सरकारी तेल कंपन्यांना दरमहा सुमारे २५,००० कोटी रुपयांचा प्रचंड तोटा सहन करावा लागत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या माहितीनुसार, या कंपन्यांना रोज ७५० कोटी रुपयांचे नुकसान होत होते, जे १५ मे रोजी झालेल्या दरवाढीमुळे थोडे कमी झाले आहे. कोटकच्या अंदाजानुसार, सध्या कंपन्यांना डिझेलवर प्रति लीटर ११.४० रुपये आणि पेट्रोलवर प्रति लीटर १४.३० रुपयांचे नुकसान होत आहे. हा तोटा पूर्णपणे भरून काढण्यासाठी इंधनाचे दर आणखी १३ ते १७ रुपयांनी वाढवावे लागतील. याबाबतचे वृत्त 'बिझनेस टुडे' ने प्रसिध्द केले आहे.

### दरवाढ होणार, पण हळूहळू!

» **ग्राहकांना** एकदम मोठा झटका बसू नये आणि महागाईचा भडका उडू नये, म्हणून सरकार आणि तेल कंपन्या सावध पावले टाकत आहेत. 'इंडियन ऑइल' (IOC) च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या संकेतांनुसार, पुढील काळात इंधनाचे दर हळूहळू (Gradual Hikes) वाढवले जातील. 'आयडीएफसी फर्स्ट बँके'च्या मते, येत्या काही महिन्यांत पेट्रोल-डिझेलच्या किमतींमध्ये एकूण १० टक्क्यांपर्यंत वाढ पाहायला मिळू शकते.

### महागाई आणि अर्थव्यवस्थेला मोठा फटका

» **इंधनाचे** दर वाढल्यास त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य वस्तूंच्या किमतींवर होतो. बँकेच्या अंदाजानुसार, केवळ पहिल्या ३ रुपयांच्या दरवाढीमुळेच महागाईचा दर १२ बेसिस पॉईंट्सने वाढू शकतो. एप्रिलमधील ३.४८% च्या तुलनेत मे महिन्यात किरकोळ महागाईचा दर ३.९% पर्यंत जाण्याची शक्यता आहे, तर आर्थिक वर्ष २०२७ मध्ये तो ५% च्या आसपास राहू शकतो. कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १०० ते १२० डॉलरवर गेल्याने भारताची चिंता वाढली आहे. कच्च्या तेलात प्रति बॅरल १० डॉलरची वाढ झाल्यास, भारताची चालू खात्यातील तूट २२ अब्ज डॉलरने वाढते. यामुळे देशाचा विकास दर ६% पर्यंत घसरू शकतो, असा इशाराही कोटकने दिला आहे. सरकारने नुकतेच सोन्यावरील आयात शुल्क ६% वरून थेट १५% केले आहे. परंतु, कोटकच्या मते यामुळे केवळ तात्पुरती खरेदी थांबेल, पण देशांतर्गत सोन्याचे भाव वाढतील. आयात शुल्क वाढवण्याऐवजी सोन्यावर जीएसटी (GST) वाढवणे अधिक फायदेशीर ठरले असते, असे कोटकने म्हटले आहे. एकूणच, जागतिक युद्धजन्य परिस्थिती अशीच राहिली, तर येणारा काळ आर्थिकदृष्ट्या अधिक आव्हानात्मक असणार आहे.

# धुळ्यात शेअर मार्केटच्या नावाखाली अभियंत्याची ३.१४ कोटींची फसवणूक !




## ४ जणांना अटक, १ कोटी १९ लाख रुपये मिळवले परत

**धुळे ।** ऑनलाइन शेअर मार्केटिंगच्या बहाण्याने वेगवेगळ्या लिंक पाठवून धुळ्यातील अभियंत्याला एकुण ३ कोटी १४ लाख ९९ हजार ८९१ रुपयाला चुना लावल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सहा आरोपी निष्पन्न झाले असून चौघांना बेड्या ठोकण्यात आल्या आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी तातडीने हालचाली करून संबंधित खाते गोठवल्यामुळे एकुण १ कोटी १९ लाख रुपये परत मिळवून देण्यात यश आले आहे.

धुळे येथील स्नेहनगरात राहणारे अभियंता हर्षद नारायण देशपांडे, यांना ऑनलाईन शेअर्स मार्केट लिंक द्वारे जास्त मोबदला मिळुन देण्याचे आमिष दाखवून त्यांचे व्हॉटसअॅपवर अज्ञातांनी वेगवेगळया मोबाईल नंबरवरुन लिंक पाठवली. त्यांना एका व्हॉटस्अॅप ग्रुप मध्ये जॉईन करुन, FYERS INDI- (HNI) अॅप डाऊनलोड करण्यास सांगीतले. सुरुवातीला काही शेअर्स घेण्यास सांगुन त्यांना जास्त परतावा मिळवून देऊन विश्वास संपादन केला. त्यानंतर अधिकचा परतावा देण्याचे वारंवार आमिष दाखवले, संबंधित भामट्यांनी देशपांडे यांना वारंवार संपर्क करून त्यांना वेगवेगळया बँक खात्यात एकुण ३ कोटी १४ लाख ९९ हजार ८९१ रूपये आरटीजीएस व अन्य ऑनलाईन पद्धतीने वर्ग करून परतावा दिला नाही. विशेष म्हणजे त्यानंतर देशपांडे यांनी वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला. पण संबंधितांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने देशपांडे यांनी थेट सायबर पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी तातडीने सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अभिजित सोनवणे यांना तपासासाठी आवश्यक त्या सूचना केल्या.

» **या गुन्हयात** तांत्रिक विश्लेषणाद्वारे सखोल तपास करण्यात आला. तपासामध्ये नायगाव (वसई) येथे बनावट कॉल सेंटर तयार करुन तेथून बनावट सिमकार्डद्वारे शेअर मार्केटमध्ये अधिकचा परतावा मिळवून देण्याचे लोकांना आमिष दाखवून शेअर्स व नवीन आयपीओ खरेदीसाठी भाग पाडले गेल्याचे दिसून आले. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधितांची फसवणूक करण्यात आली. ही फसवणूक करणाऱ्या टोळीतील सहा पैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरीत आरोपींचा शोध सुरु आहे. फसवणुकीची रक्कम वेगवेगळया बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात आली होती. सदर बँक खाते तात्काळ गोठवून फिर्यादी देशपांडे यांना एकुण १ कोटी १९ लाख रुपये परत मिळवून देण्यात यश आले आहे. साबिर मोहम्मद खान (रा.निल संकुल, बि.क्र.६, रूम क्र.४, सेक्टर ८, कळबोली, नवी मुंबई), सनत संजीव दास (रा.जी/६०१, ब्लु माउंट इडीफाईस, सनसिटी, वसई (पश्चिम)), राहुलकुमार शुक्ला ऊर्फ कैलाश राकेशकुमार (रा. ऐ-४०२, स्वागत हाईट्स, जीसीसी क्लब जवळ, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे), आमिर करमशेर खान (रा. फ्लॅट क्र.४, ए, नूर ए हक अपार्टमेंट, रोड क्र. १७, आझादनगर, मानगो, जमशेदपुर, झारखण्ड), अभिषेक अनिल नारकर ऊर्फ गोपाल (रा. रूम नंबर ६०१, बी-विंग, पुनम दर्शन, पुनम नगर, अंधेरी पूर्व, मुंबई (फरार)), मोहम्मद रशिद फकीर मोहम्मद बलोच ऊर्फ लक्की (रा. रूम नंबर ६, मोहम्मद हुसेन वाळ, मकरानी पाडा, सुभाष नगर, जोगेश्वरी पूर्व, मुंबई), रोशनकुमार सिथारामा शेट्टी (रा. साईराधा, गोकुलधाम, ए/१०१, बैलकेरे, उडपी १, कर्नाटक (फरार)) अशी संशयीत आरोपींची नावे आहेत.

**पोलीस अधीक्षकांचे आवाहन :** धुळे जिल्हयातील सर्व नागरीकांना पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी अनोळखी ऑनलाईन लिंक पासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. ऑनलाइन शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना एसईबी रजिस्ट्रर ब्रोकर्सद्वारे डिमॅट अकाउंट द्वारेच गुंतवणूक करावी. बनावट अॅप, लिंक वर भरोसा करुन अल्पावधीत जास्त परतावा मिळवून देण्याच्या आमिषाला बळी पडून कोणीही गुंतवणूक करु नये. तात्काळ सायबर हेल्प लाईन नंबर १९३० या टोल फ्री नंबरवर कॉल करा, अथवा सायबर पोलीस ठाणे, धुळे येथे संपर्क साधून तक्रार दाखल करावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रवासी विमानातून दिल्लीला

## मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद

। मुंबई ।

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या नियोजित दिल्ली बैठकीसाठी खासगी विमानाऐवजी एअर इंडियाच्याप्रवासी विमानातून करण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी दुपारी ४ वाजता एअर इंडियाच्या प्रवासी विमानाद्वारे मुंबईहून दिल्लीला रवाना झाले. जागतिक बाजारपेठेत तेलाचा किंमती वाढल्याने भविष्यातील धोका ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीचा संदेश दिला होता. या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी देशातील आपल्या राजकीय सहकाऱ्यांनाही केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत विशेष बैठक घेऊन राज्यातील सर्व मंत्र्यांसाठी नियमावली जाहीर केली होती.

### अभिवादन स्वीकारत एकनाथ शिंदेयांनी विमान गाठले



» **एकनाथ** शिंदे यांचे मुंबई विमानतळावर उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी अनेकांनी त्यांच्यासोबत फोटो काढून घेतले. तर काहींनी त्यांना भेटून आपले निवेदन त्यांच्या हाती दिले. या सर्वांना भेटून त्यांचे अभिवादन स्वीकारत एकनाथ शिंदे यांनी विमान गाठले. केंद्रीय नगरविकास विभागाच्या वतीने दिल्लीत स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० ची विशेष आढावा बैठक दिल्लीत आयोजित केली आहे. या बैठकीत सहभागी होण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना झाले. ते स्वतः या बैठकीत सहभागी होणार आहेत. एरवी खासगी विमानाने प्रवास करणाऱ्या शिंदे यांनी यावेळी मात्र सर्वसामान्य नागरिकाप्रमाणे प्रवासी विमानाने दिल्लीला जाण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी तत्काळ ईव्ही गाडी वापरण्याचा निर्णय घेतला. तसेच आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी केली. हेलिकॉप्टरने होणारे आपले दौरे कमी केले असून, आता तर खासगी विमानाने प्रवास न करता एअर इंडियाच्या प्रवासी विमानाने प्रवास करण्याला प्राधान्य दिले आहे. पंतप्रधान मोदींच्या आवाहनाचे पालन करण्यात उपमुख्यमंत्री शिंदे कोणतीही कसूर बाकी ठेवत नाहीत हेच त्यांचा या छोट्याशा कृतीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# भुसावळात पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र चौधरींचा शिंदे गटात



**भुसावळ ।** भुसावळ पंचायत समितीचे माजी सभापती व भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी राजेंद्र चौधरी यांनी आपल्या समर्थकांसह एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत सोमवार, १८ रोजी प्रवेश केला. भुसावळ तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मिळणार्या अन्यायकारक वागणुकीच्या कारणामुळे त्यांचे लोकप्रतिनिधींशी वैचारिक मतभेद झाल्याने राजेंद्र चौधरी यांनी भारतीय जनता पक्षाचा राजीनामा दिला होता. दरम्यान, आपल्या राज्यव्यापी शिवसंवाद दौर्याची सुरुवात सुरुवात सोमवारी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नाशिकमधून केली. सोमवारी शिवसेनेचे नेते खासदार श्रीकांत शिंदे व राज्याचे पाणीपुरवठा मंत्री नामदार गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनात नाशिकच्या एक्सप्रेस इन हॉटेलच्या सभागृहात झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत प्रवेश सोहळा झाला. कहॉटेल एक्सप्रेस इनमध्ये झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत आमदार मनीषा कायंदे, जळगावचे माजी खासदार उन्मेश पाटील उपस्थित होते.

# जळगाव विधान परिषदेवर कोण मारणार बाजी ? पालकमंत्री की भाजपचे संकटमोचक !

। जळगाव प्रतिनिधी।

**स्थानिक** स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक जाहीर झाली आहे. १८ जून रोजी मतदान विधान परिषदेसाठी होणार आहे. मिनी मंत्रालयाच्या निवडणुकीपूर्वीच जळगाव जिल्ह्यात राजकारणात तापले आहे. या रिंगणात महायुतीकडून प्रताप पाटील (शिंदे गट), डॉ. केतकी पाटील, नंदू अडवाणी आणि नंदकिशोर महाजन (भाजप) आणि महाविकास आघाडीचे छुप्या भूमिकेतील शिलेदार आहे. जिल्ह्यातील राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठी आणि 'पालकमंत्री विरुद्ध संकटमोचक' यांच्यातील अंतर्गत अस्तित्वाची लढाई म्हणून राहणार आहे की नाही ते पाहणे महत्वाचे आहे.

जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात आजवरचा इतिहास पाहता भाजपचा नेहमीच 'बोलबाला' राहिला आहे. केवळ एकाच अपवादात्मक वेळी भाजपला या जागेवर पराभवाचा झटका सहन करावा लागला होता. मात्र, यंदाची समीकरणे बदलली आहेत.



शिवसेना शिंदे गटाचे सर्वेसर्वा आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आपले सुपुत्र प्रताप पाटील यांच्यासाठी ही जागा पदरात पाडून घेण्यासाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. शहरात लागलेल्या 'भावी आमदार' अशा प्रताप पाटलांच्या बॅनर्सनी भाजपच्या गोटात आधीच अस्वस्थता निर्माण केली आहे. दुसरीकडे, भाजपकडून डॉ. केतकी पाटील, नंदू अडवाणी आणि नंदकिशोर महाजन यांनीही जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली असून, पक्षाने ही जागा आपल्याकडेच राखण्यासाठी हट्ट धरला आहे. त्यामुळे महायुतीत ही जागा नेमकी कुणाच्या वाट्याला जाते, यावर बरेच काही अवलंबून असेल.

» **जळगाव** जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरसेवकांचे संख्याबळ पाहिले तर महायुतीचे पारडे वरवर तरी जड दिसते. भाजप : सर्वाधिक नगरसेवक (प्रथम क्रमांकावर) शिवसेना (शिंदे गट): दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): तिसऱ्या क्रमांकावर. जर महायुतीने शिवसेनेच्या प्रताप पाटील यांना उमेदवारी दिली, तर त्यांचा मार्ग अत्यंत सुकर होईल. परंतु, भाजपने उमेदवारी नाकारल्यास आणि बंडखोरी झाल्यास प्रताप पाटील यांना 'महाविकास आघाडी'कडे छुप्या मदतीचा हात मागावा लागेल. विरोधी गोटात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडे सर्वाधिक मते आहेत, त्याखालोखाल काँग्रेस आणि काही मोक्याचे अपक्ष व स्थानिक आघाड्यांचे मतदार आहेत. त्यामुळे महायुतीत बिघाडी झाली, तर छुप्या मतदानाची आणि फोडाफोडीची मोठी लागण जिल्ह्याला होऊ शकते. जळगावच्या राजकारणाचे दोन प्रमुख ध्रुव म्हणजेच भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन आणि शिवसेनेची मुलुख मैदान तोफ गुलाबराव पाटील. या दोन्ही नेत्यांमध्ये या जागेवरून काय समझोता होतो किंवा कोणती राजकीय तडजोड यावरच निवडणुकीचे भवितव्य ठरेल. दोन्ही नेत्यांनी समन्वयाची भूमिका घेतली तर निवडणूक 'बिनविरोध' होण्याचे मार्ग मोकळे होतील, अन्यथा महायुतीमधील छुपी फूट थेट मतपेटीतून बाहेर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. १८ जूनच्या रणसंग्रामापूर्वी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेतच जळगावच्या या राजकीय नाटकाचा पूर्वार्ध स्पष्ट होईल, यात शंका नाही!

# मान्सून अंदमानात दाखल; ६ जूनला कोकणात धडकणार

## राज्यात पूर्वमोसमी पावसाचा इशारा, ४८ तासात अंदमानच्या समुद्रात सरकणार

। मुंबई ।

भारतीय हवामान विभागाने देशातील शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी दिली आहे. नैऋत्य मोसमी पावसाने (मान्सून) अधिकृतपणे अंदमान-निकोबार बेटे, बंगालचा उपसागर आणि आग्नेय अरबी समुद्राच्या काही भागात प्रवेश केला आहे. अंदमानच्या समुद्रात आणि निकोबार बेटांच्या उर्वरित भागात मान्सून पुढे सरकण्यासाठी सध्या अत्यंत अनुकूल वातावरण तयार झाले असून, पुढील ४८ तासांत तो दक्षिण अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांत धडकेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील मान्सूनच्या आगमनाबाबतही महत्त्वाची माहिती समोर आली असून, येत्या ६ जून रोजी मान्सून कोकण किनारपट्टीवर दाखल होण्याची दाट शक्यता आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, मान्सूनच्या वाटचालीचा वेग सध्या समाधानकारक आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील बदलत्या हवामानामुळे मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. पुढील दोन दिवसांत (४८ तास) मान्सून दक्षिण अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरात आपले स्थान आणखी मजबूत करेल. या पोषक स्थितीमुळे यंदा मान्सून वेळेवर किंवा काहीसा लवकर येण्याचे संकेत मिळत आहेत.



### ६ जूनला कोकणात आगमन!

» **महाराष्ट्राच्या** दृष्टीने आनंदाची बातमी म्हणजे, मान्सून ६ जून रोजी कोकणात धडकण्याचा अंदाज आहे. दरवर्षी साधारणपणे ७ ते १० जूनच्या दरम्यान मान्सून महाराष्ट्रात प्रवेश करतो. मात्र, यंदा ६ जूनलाच कोकणात मान्सूनचे आगमन होण्याचे संकेत मिळाल्याने राज्यातील शेतीकामांना वेग येण्याची शक्यता आहे.

### राज्यात पूर्वमोसमी पावसासाठी पोषक हवामान

» **मुख्य** मान्सून ६ जूनला येणार असला, तरी सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पूर्वमोसमी (वलसाडी) वादळी पावसासाठी पोषक हवामान तयार झाले आहे. राज्याच्या विविध भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होत असून, काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह पूर्वमोसमी पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. वाढत्या उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळणार असला, तरी शेतकऱ्यांनी काढणी झालेली पिके आणि शेतीमाल सुरक्षित स्थळी साठवून ठेवावा, असे आवाहन हवामान तज्ज्ञांनी केले आहे.

# त्वचेची काळजी कशी घ्याल वयोमानानुसार..

**विशीच्या** वयात त्वचा मुलायम, मऊ आणि घट्ट असते. त्वचेचा रंग सफरचंदाच्या सालीसारखा दिसतो, पण या वयातसुध्दा मॉइश्चरायझर लावणे आवश्यक असते. कारण त्वचा मॉइश्चर ठेवणाऱ्या पेशी हळूहळू निष्क्रिय होत असतात. मेकअप करण्यापूर्वी मॉइश्चरायझर लावावे.

तिशीमध्ये त्वचा कोरडी पडायला लागते. थोडीशी पिवळसर किंवा क्रिमी दिसायला लागते. डोळ्यांच्या भोवतालची आणि तोंडाभोवतालच्या त्वचेची काळजी या वयात जास्त घ्यायला हवी. फुल्याफुल्यासारख्या सुरकुत्या दिसल्या तर ते त्वचा कोरडी असल्याचे लक्षण आहे. गालावर आणि कपाळावर हा कोरडेपणा जास्त दिसतो. तुमच्या चेहऱ्यावर केवळ हसण्याच्याच रेषा दिसतात असं नाही, काळजीच्या आणि नाराजीच्या रेषासुध्दा दिसतात. त्या रेषांवर जरा लक्ष द्या.



चाळिशीमध्ये डोळ्याखालच्या आणि गळ्यावरच्या सुरकुत्यांकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. तिशीमध्ये त्वचेची काळजी घेतात तशीच चाळिशीमध्येही घ्यावी लागते. त्वचेला सतत 24 तास पौष्टिक घटक कसे मिळतील याचा विचार करायला हवा.

चाळिशीच्या शेवटीशेवटी किंवा पन्नाशीला त्वचेची नीट काळजी घेतली नाही तर त्वचा खूप कोरडी आणि सैल पडते. तोंडाभोवती आणि डोळ्याखाली व कपाळावर सुरकुत्यांचे जाळे पसरते. त्वचा निस्तेज व काळसर दिसू लागते. त्वचेखालच्या सूक्ष्म रक्तवाहिन्या सहजपणे फुटतात. त्यातून पाझरलेल्या रक्तामुळे लालसर जांभळ्या रंगाचे डाग दिसू लागतात. स्नायू सैल झाल्यामुळे हनुवटीखालची त्वचा लोंबायला लागते. ओठांचे कोपरे खाली झुकतात. मानेवर आडव्या रेषा दिसतात. गळ्याचे स्नायू लोंबायला लागतात. पण याची सुरुवातीची लक्षणे दिसताच रोज हलका मसाज आणि क्रीम लावल्याने पुढची लक्षणे दिसणार नाहीत. एक लक्षात ठेवा, फक्त झोपतानाच त्वचेची काळजी घ्यायची नसते तर 24 तास काळजी घ्यायची असते.

# भूक वाढविण्यासाठी हे करून बघा

**काही** लोकांना नीट भूक लागत नाही. त्यामुळे असे लोक वेळेवर जेवत नाहीत. त्यामुळे अशक्तपणा येऊ लागतो.

▶ काळ्या मिठाने गॅसेसची समस्या कमी होते आणि भूक वाढते. पोटही साफ राहते.

▶ हिरड्याचे चूर्ण, सुंठ, गूळ, सैंधव मीठ एकत्र घेतल्यानेही ही समस्या दूर होते.

▶ सैंधवमीठ, हिंग, ओवा आणि त्रिफळा हे सर्व समप्रमाणात घेऊन त्याचे चूर्ण करावे. चूर्णाएवढाच गूळ त्यात मिसळावा आणि त्याच्या छोट्या गोळ्या कराव्यात. जेवणानंतर एक-दोन गोळ्या घ्याव्यात.



▶ सफरचंदान भूक वाढून रक्त शुद्धी होते.

▶ हिरडा कडूनिंबाच्या निंबोण्यांबरोबर खाल्ला तर भूक वाढते. त्वचा रोग नाश होतो.

▶ हिरडा, गूळ, सुंठ यांचे चूर्ण करून थोड्या प्रमाणात ते मठ्ठ्याबरोबर घ्यावे.

▶ सुंठीचे चूर्ण तुपात मिसळून गरम पाणी प्यायल्यास चांगली भूक लागते.

▶ रोज जेवण करण्याआधी आल्याला सैंधव मीठ लावून खाल्ल्यास भूक वाढते.

▶ गव्हाच्या कोंड्यामध्ये सैंधव मीठ आणि ओवा घालून त्याची पोळी बनवून खावी त्यामुळेही ही समस्या दूर होते.

उन्हाळ्याच्या सुट्टीत किंवा वाढत्या उष्णतेमुळे आपण अनेकदा फॅन आणि कुलर 24 तास सुरू ठेवतो. पण तुम्हाला माहीत आहे का? तुमची एक साधी चूक महिन्याच्या शेवटी येणाऱ्या वीज बिलात हजारो रुपयांची वाढ करू शकते. कुलर चालवण्याची चुकीची पद्धत आणि फॅनकडे होणारे दुर्लक्ष केवळ वीजच वाया घालवत नाही, तर तुमच्या खिशाला मोठा फटका बसवते. या लेखात आपण पाहणार आहोत की वीज बिल नियंत्रणात ठेवून थंडावा कसा मिळवायचा.

# १० पैकी ८ जण, चूक करतात; बदलल्यास फॅन, कुलरचे लाइटबिल आपोआप कमी होईल

वाढत्या तापमानासोबतच प्रत्येकाच्या घरात फॅन आणि कुलरचा वापर वाढला आहे. अनेक जण रात्रीपासून ते दिवसापर्यंत ही उपकरणे सतत सुरू ठेवतात. मात्र, तांत्रिकदृष्ट्या 'व्हेंटिलेशन' आणि 'मेंटेनन्स' कडे दुर्लक्ष केल्यास ही उपकरणे गरजेपेक्षा जास्त वीज खेचतात. नेमकी कोणती चूक वीज बिल रॉकेटसारखे वाढवते आणि त्यावर उपाय काय, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.



बीईई नुसार, 5 स्टार रेटिंग असलेले सीलिंग फॅन वापरा. हे फॅन साधारण 30-35 वॅटमध्ये चालतात, ज्यामुळे निम्मी वीज वाचते. अशाच काही खास टिप्स आपण पाहणार आहोत.

उन्हाळ्याच्या तडाख्यात फॅन आणि कुलर हे आपले सर्वात जवळचे मित्र असतात. पण हे मित्र खिशाला कात्री लावू शकतात, जर तुम्ही त्यांचा वापर चुकीच्या पद्धतीने केला. अनेकांना प्रश्न पडतो की फॅन किंवा कुलर दिवसभर सुरू ठेवल्याने विजेचे बिल किती येते? एक छोटीशी चूक तुमचे लाइट बिल खरोखरच रॉकेटसारखे वाढवू शकते.

### फॅन दिवसभर सुरू ठेवणे योग्य आहे का?

फॅन हवा थंड करत नाही, तो फक्त हवेचे अभिसरण करतो. जेव्हा खोलीत कोणीही नसेल, तेव्हा फॅन सुरू ठेवणे म्हणजे शुद्ध विजेचा अपव्यय आहे. एक सामान्य फॅन तासाला 70-80 वॅट वीज वापरतो.

**चूक:** खोलीबाहेर जाताना फॅन सुरू ठेवणे. फॅनमुळे घाम सुकतो आणि आपल्याला थंडावा जाणवतो, पण तो खोलीचे तापमान कमी करत नाही. रिकाम्या खोलीत फॅन सुरू ठेवल्याने फक्त मोटर गरम होते आणि वीज बिल विनाकारण वाढते.

### कुलरचा स्मार्ट वापर, 'ही' चूक टाळा

कुलर हा फॅनपेक्षा जास्त वीज खातो (साधारण 150-250 वॅट). कुलर वापरताना सर्वात मोठी चूक म्हणजे 'ह्युमिडिटी' कडे दुर्लक्ष करणे. बंद खोलीत कुलर: जर तुम्ही खिडक्या-दरवाजे बंद करून कुलर लावला, तर खोलीत आर्द्रता वाढते. यामुळे थंडाव्याऐवजी चिकचिकाट जाणवतो आणि आपण कुलरचा स्पीड वाढवतो. व्हेंटिलेशन आवश्यक: कुलरला नेहमी खिडकीत किंवा अशा ठिकाणी ठेवा जिथे बाहेरची ताजी हवा मिळेल. पाठीमागून हवा येणे आणि समोरून गरम हवा बाहेर जाण्यासाठी जागा असणे आवश्यक आहे.

### बिल 'रॉकेट' वेगाने वाढवणारी 'ती' एक चूक

सर्वात मोठी चूक म्हणजे उपकरणांची देखभाल न करणे. जुन्या मोटार आणि वाइंडिंग: जर फॅन किंवा कुलरची मोटार जुनी झाली असेल किंवा जाम झाली असेल, तर ती फिरण्यासाठी जास्त वीज खेचते. घाणेरडे पॅड्स: कुलरचे गवत जर क्षारांनी किंवा धुळीने भरले असेल, तर पाणी नीट पसरत नाही. परिणामी, थंडावा मिळत नाही आणि आपण तासन्तास कुलर 'हाय स्पीड'वर चालवतो. रेग्युलेटर: जुने 'रेझिस्टन्स' वाले रेग्युलेटर फॅनचा स्पीड कमी केला तरी तेवढीच वीज खातात. त्याऐवजी आधुनिक 'इलेक्ट्रॉनिक रेग्युलेटर' वापरावेत.

### वीज बिल कमी करण्यासाठी टिप्स

जर हवा आधीच थंड असेल, तर कुलरचा पाण्याचा पंप फक्त काही वेळासाठी सुरु ठेवा. रात्री झोपताना टायमर लावा. पहाटे हवा आपोआप थंड होते, तेव्हा उपकरणांची गरज नसते. दर 15 दिवसांनी कुलरचे जाळे आणि फॅनची पाती स्वच्छ करा.

# आरोग्यासाठी हाय एनर्जी सीड्स किती फायदेशीर आहे, जाणून घ्या



या बियांमध्ये प्रथिने, ब 1 जीवनसत्त्व, ओमेगा 3 फॅटी ॲसिड्स, झिंक, मॅग्नेशियम, कॉपर हे क्षार असतात. दोन टेबलस्पून जवसाच्या बियांमध्ये 6 ग्रॅम फायबर आणि 4 ग्रॅम प्रथिने असतात.

### शेंगदाणे:

शेंगदाण्यांमध्ये प्रथिने आणि शरीराला आवश्यक असणारी फॅट्स भरपूर प्रमाणात असतात. कच्चे, भाजलेले खारे शेंगदाणे किंवा गूळ-शेंगदाण्याचा लाडू, शेंगदाण्याचा कूट, चिक्की अशा कोणत्याही प्रकारात शेंगदाणे खाता येतात. मात्र, पचायला जड असल्याने शेंगदाणे प्रमाणातच खावेत.

### काळे आणि पांढरे तीळ:

तीळ बुद्धी वाढवितात, दातांसाठी हितकर असतात, वर्ण उजळवतात, व्रण भरून येण्यासाठी हितकर असतात, वाताला कमी करतात व कफ वाढवितात. तसेच, मूळव्याधीवर गुणकारी, हाडांच्या मजबुतीसाठी उपयुक्त आहेत. वजन वाढविणाऱ्या आणि कमी करू इच्छिणाऱ्या अशा दोघांनीही तीळ खाणे हितकारक आहे. काळ्या तिळांत औषधी गुणधर्म असतात.

### भोपळ्याच्या बिया:

यामध्ये ई जीवनसत्त्व, झिंक, मँगेनीज, फॉस्फरस, मोनोसॅच्युरेटेड फॅट्स, ओमेगा 6 फॅटी ॲसिड्स असतात, हृदयविकार, मधुमेहींसाठीही भोपळ्याच्या बिया उपयुक्त आहेत. सर्व प्रकारचे कॅन्सर्स, विशेषतः प्रोस्टेट कॅन्सरचा धोका कमी होतो. यासाठी रोज दोन ते चार चमचे भोपळ्याच्या भाजलेल्या बिया खाल्ल्याच पाहिजेत.

### हळीव :

100 ग्रॅम हळिवांत तब्बल 100 मिलिग्रॅम आयर्न असते. तसेच लोह, कॅल्शियम, फॉलेट, बेटाकेरोटीन, क जीवनसत्त्व व टोकोफेरॉक हे पोषक घटक असतात. रजःस्त्रव नियमित करण्यात मदत करते. यात अँटिऑक्सिडंट्स व रक्तशुद्धी करणारे घटक असतात. अंकुरलेले हळीव सलाडमध्ये घालून घेतल्यास ते डोळ्यांसाठी हितकर आहेत. हळिवांतील चिकट गुणधमामुळें मलाविरोधाची तक्रार कमी होते. हळिवाच्या गॉयट्रोजेनिक गुणधमामुळें हायपोथायरॉईडचा त्रास असणाऱ्यांनी या बियांचे पदार्थ खाऊ नयेत.

### सूर्यफूलाच्या बिया:

सूर्यफुलात ई जीवनसत्त्व, कॅल्शियम, अँटी ऑक्सिडेंट्स मोठ्या प्रमाणात असतात. या बिया पोषणमूल्यांनी अत्यंत समृद्ध आहेत. या बियांमधील फायटोसस्टेरॉल घटकामुळे कोलेस्टेरॉल कमी व्हायला मदत होते. रोगप्रतिकार शक्ती वाढवतात. केसांची मुळे घट्ट होतात. मासिक पाळीच्या वेळी होणारी चिडचिड, मूड स्विंग, पोटदुखी आदी त्रास कमी होतात.

### खसखस :

या काहीशी मातकट चव लागणाऱ्या बिया पोषणमूल्यांनी समृद्ध असतात. यातून कॅल्शियम, लोह, प्रथिनेही मिळतात. यात प्रति औंस 6 ग्रॅम फायबर्स असतात. यामुळे पचनक्रिया सुधारते. यामध्ये औषधी गुणधर्मही आहेत. पोटदुखी, उलटीच्या समस्येवर गुणकारी आहेत.

# तांदळाचे आप्पे

**साहित्य-** तांदूळ, उडीद डाळ, चणाडाळ, हिरवी मिरची, खोबरे, मीठ, राई, कडीपत्ता.

**कृती-** तांदूळ, उडीद डाळ, चणाडाळ हे वेगवेगळे आदल्या दिवशी भिजत ठेवावे. रात्री वेगवेगळे मिक्सरमधून वाटून घ्यावे. मीठ चवीप्रमाणे घालावे. सर्व मिश्रण एकत्र करून रात्रभर ठेवावे. सकाळी पीठ खूप फुगून येते. त्यात ओल्या खोबऱ्याचे तुकडे घालावे. मिरची, मोहरी, कडीपत्ता तेलात घालून फोडणी करावी आणि त्या मिश्रणात घालावी. मिश्रण एकसारखे करून आप्प्याच्या तव्यावर खोलगट भागात थोडे थोडे घालावे. गॅस-वर पत्रा ठेवावा व त्यावर आप्प्याचा तवा ठेवावा म्हणजे आप्पे करपत नाहीत. चटणीबरोबर खूप छान लागतात. याच आप्प्यांमध्ये साखरेचे प्रमाण वापरले तर गोड आप्पे नुसते छान लागतात.



# करूनी तेल मसाज, मिळवा सुंदर-बळकट केसांचा साज



आपल्या केसांच्या प्रकृतीनुसार नेहमी तेल लावायला हवे. केस जर तेलकट असतील तर आठवड्यातून एकदाच तेल लावावे. रूक्ष कोरड्या केसांना शाम्पू करण्याच्या आदल्या रात्री डोक्याला तेलाचा मसाज करावा व सकाळी ते धुवून टाकावेत. तेलकट केसांच्या मुळांना तेल न लावता केसांच्या टोकांना लावावे. तर रूक्ष केसांना थोडे गरम करून तेल लावावे. तेल केव्हा लावू नये.

- चेहऱ्यावर मुरमे-पुरळ असतील तर केसांना तेल लावू नये.
- जर आपण केस पर्म करीत असाल तर पर्म करण्यापूर्वी आठवडाभर केसांना तेल लावू नये.
- डोक्यामध्ये पुरळ असतील तर ते होईपर्यंत केसांना तेल लावू नये.
- बाहेर उघड्यावर जास्त वेळ वावरायचे असेल तर केसांना तेल लावू नये. कारण प्रदूषणामुळे डोक्याच्या त्वचेवर थर जमा होतो.



### तेल कसे लावावे

- तेल लावण्यापूर्वी केसातील गुंता काढून केस मोकळे करावेत. यामुळे डोक्यात जमलेल्या मृतपेशी व धूळ-माती निघून जाईल.
- केस विंरल्यानंतर केसांच्या प्रकृतीनुसार केसांच्या मुळांना वा टोकांना बोटाने किंवा कापसाच्या फायाने तेल लावून मसाज करावा.
- जेव्हा आपण डोक्यावर तेलाने मसाज करीत असाल तेव्हा कनपटीच्या दोन्ही बाजुंना दाब देत मानेमागे अंगठा न्या. असा मसाज केल्यामुळे डोक्याच्या त्वचेतील रक्ताभिसरण वाढते व डोक्यातील शिरांना आराम मिळतो.

### मसाजाचा फायदा

- डोक्याच्या मसाजाचा डोक्याप्रमाणेच डौयांना व कानांनाही फायदा होतो.
- रात्री मसाज केल्यास दिवसभराचा थकवाही दूर होतो.
- झोप न येणा:या व्यक्तींनी रात्रीच डोक्याला हलक्या हाताने मसाज करावा. गाढ झोप येईल.
- डोक्याला मसाड केल्यास मुळे मजबूत होतात व केसही कमी गळतात.
- डोक्याच्या मसाजमुळे मेंदू क्रियाशील होतो व चेहरा सुंदर दिसतो.
- नियमित मसाज केल्यास केसांत कोंडा होत नाही व ते रूक्ष होत नाहीत.

# नारळाचं पाणी - पित्ताचा त्रास कमी करणारा नैसर्गिक उपाय

**उन्हाच्या** झळा बसत असताना ग्लासभर नारळाचं पाणी तुम्हांला दिलासा देते. शरीरात थंडावा निर्माण करर्णाया नारळाच्या पाण्याचे काही आरोग्यदायी गुणधर्मदेखील आहेत. शरीरात पित्त वाढले असताना नारळाचे पाणी प्यायल्यास त्याचा त्रास कमी होण्यास मदत होते. मळमळ, छातीतील जळजळ कमी होण्यास मदत होते.

### कसे ठरते फायदेशीर ?



नारळाचे पाणी प्यायल्यास शरीरातील ॲसिड घटकांचे अल्कलाईनमध्ये रुपांतर होण्यास मदत होते. परिणामी ॲसिडीटीचा त्रास शमवण्यास मदत होते. नारळाच्या पाण्यामध्ये फायबर घटक मुबलक प्रमाणात असल्याने पित्ताचा त्रास उलटण्याची शक्यता कमी होते. तसेच पोटात थंडावा निर्माण झाल्याने जळजळ कमी होण्यासही मदत होते.

### कसा कराल हा उपाय ?

- पित्ताचा त्रास रोखण्यासाठी जेवल्यानंतर अधार्तासाने ग्लासभर नारळाचे पाणी प्यावे.
- पोषणयुक्त आहारासोबत नियमित जेवणानंतर 2-3 महिने नारळ्याचे पाणी प्यायल्यास पित्ताचा त्रास कायमस्वरूपी आटोक्यात राहण्यास मदत होईल. सोबतच पचनही सुधारेल.

# स्ट्रॉबेरीने वाढवा तुमच्या त्वचेचं सौंदर्य!



**वाढतं** प्रदूषण, टोबॅको, विषारी घटक याचा कळत नकळत आपल्या शरीरावर मारा होत असतो. यामुळे स्वास्थ्य बिघडण्यासोबतच त्वचेचेदेखील नुकसान होते. शरीरात फ्री रॅडीकल्सचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे त्वचा निस्तेज होते. मग यापासून सुटका मिळवण्यासाठी काही ब्युटीट्रीटमेंट घेण्याऐवजी 'स्ट्रॉबेरी', रासबेरी सारख्या बेरीजचा आहारात समावेश करा. सध्या हिवाळ्याचे दिवस सुरू आहेत, बाजारात स्ट्रॉबेरी मुबलक प्रमाणात उपलब्ध होईल. मग पहा त्याच्या सेवनाने कसे सुधारेल तुमच्या त्वचेचे आरोग्य..



बेरीजमध्ये मॅग्निज आढळते. यामुळे त्वचेतील विषारी घटकांचे ऑक्सिजनमध्ये रुपांतर होऊन त्वचेचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होते.

त्वचेचे आरोग्य सुधारण्यासाठी तुम्ही घरच्या घरी फळांचा फेस मास्र्क बनवू शकता. फळांमुळे त्वचा तजेलदार होते. तसेच हायड्रेटेड होण्यासही मदत होते.

### कसा बनवाल हा फ्रुट मास्क?

- 4-5 स्ट्रॉबेरीज, अर्धे अव्हॅकॅडो, थोडासा लिंबाचा रस एका बाऊलमध्ये एकत्र करून त्याची मऊ पेस्ट बनवा.
- तयार मास्क चेर्हयावर लावा. मात्र डोळ्यामध्ये जाणार नाही याची विशेष काळजी घ्या.
- 20 मिनिटे हा मास्क चेर्हयावर सुकू द्या. नंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा.



# या वस्तूंना साठवून ठेवणे महागात पडू शकते

काही लोकांची सवय असते की त्यांना वषार्तून किमान एकदा तरी घरातल्या वस्तू भरलेल्या पाहिजेत. ही एक जुनाट परंपरा आहे जी पिढ्यान पिढया चालू आहे. ज्यावेळी स्त्रिया बघतात की कोणत्याही वस्तू कमी किमतीत बाजारपेठेत उपलब्ध आहेत तेव्हा ते पैसे वाचविण्याच्या फायद्यासाठी मोठ्या प्रमाणात विकत घेतात, परंतु काही काळानंतर त्या वस्तू खराब होतात आणि नुकसान होत. म्हणून हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की काय विकत घ्यावे आणि काय नाही. चला तर मग जाणून घेऊ या.



### मसाले-

मसाले एकदाच एका वर्षात विकत घेणे योग्य नाही. खरं तर सहा महिन्यातच मसाले आपली चव गमवायला सुरुवात करतात. ते फिकट होऊ लागतात. दररोज कमी प्रमाणात लागणारे मसाले खरेदी करा. गॅस जवळ मसाले ठेवू नका. त्याचा रंग, चव, सुगंध कमी होऊ लागतात.

### सनस्क्रीनवर

साधारणपणे सनस्क्रीनवर दोन ते तीन वर्षांची मुदत असते, परंतु तरीही एक मोठी बाटली खरेदी करू नका कारण तीन वर्ष सनस्क्रीन खराब न होण्याची हमी दिलेली असते, जेव्हा ती उष्ण तापमानात ठेवलेली असते तेव्हा हळू-हळू खराब होण्यास सुरुवात होते. चुकून उन्हात किंवा स्विमिंग पुलाच्या जवळ सनस्क्रीन ठेवल्यावर त्वचेवर परिणाम करते.

### तेल -

बऱ्याच लोकांची सवय असते की ते स्वयंपाकघरात लागणारे तेलाचा वषार्चा साठा करून ठेवतात.6 महिनेच तेलाची मुदत असते जास्त काळ तेल ठेवल्याने आरोग्यावर परिणाम होऊ लागतो म्हणून जास्त खाद्य तेल खरेदी करू नका.

### अंडी -

जर आपल्या घरात दररोज न्याहारीत अंडी खात असाल तर त्यासाठी मोठी ट्रे विकत आणणे योग्य नाही. अंडी जास्त काळ टिकत नाही तीन ते पाच आठवडे अंडी फ्रीजमध्ये चांगले राहतात. म्हणून अंडी नेहमी आपल्या गरजेप्रमाणेच आणा.

# 'या' आहारानं करा उन्हाळा सुसह्य

होळी झाली आणि हिवाळा संपला. तापमापकाचा पारा अचानक उडी मारून उंचावू लागला आहे. तर दर वर्षी वाढत चाललेल्या उन्हाळ्यात सतत घाम येऊन शरीरातील पाणी कमी होते. खूप गळून गेल्यासारखे होते. या गरमागरम दिवसात प्रत्येक जण आपापल्या समजुतीनुसार शरीराला गारवा देण्याचा प्रयत्न करतो. तसे पहिले तर, उन्हाळ्याचा काळ म्हणजे आहारावर सहजरित्या नियंत्रण करायला आणि वजन कमी करायला अगदी उत्तम ऋतू ठरू शकतो. या काळात हेल्दी राहण्यासाठी काही सोपे उपाय करता येतात. उन्हाळ्याच्या काळात जास्त कॅलरीजचे पदार्थ टाळून कमी कॅलरीजच्या पदार्थांकडे आहार वळवावा. यामुळे थंडावा निर्माण होण्यासोबतच वजन कमी होते, उत्साह आणि कार्यक्षमतादेखील वाढते.यासाठी खालील गोष्टींचा अवलंब करा.

### पाणी -

शरीरात गारवा निर्माण करायला पाण्यासारखे दुसरे साधन नाही. गार पाण्याने अंघोळ, दिवसातून चार-पाच वेळा गार पाण्याने चेहरा धुणे आणि संध्याकाळी थंड पाण्याचा शॉवर घेणे यामुळे शरीर गार राहते. विशेष म्हणजे यामुळे शरीरातील उष्णता बाहेर पडण्यास मदत होते. उन्हाळ्यामध्ये किमान ३-४ लिटर पाणी प्यावे. यामध्ये साधे गार पाणी आणि इतर द्रवपदार्थ यांचा वापर करावा. शरीराला गारवा वाटण्यासाठी फ्रीजमधील पाणी पिण्यापेक्षा माठातील वाळा घातलेले पाणी उत्तम.



### सब्जा आणि तुळशीचे बी-

सब्जा पाण्यामध्ये भिजवून ताक, फालुदा, सरबते किंवा नुसत्या थंड पाण्यामध्ये घालून प्यायले जाते. या दोन्हीमुळे शरीराला कमी वेळात गारवा मिळतो.

### फळे आणि भाज्या-

काकडी, कलिंगड अशा थंडावा देणाऱ्या पदार्थांचा आहारात समावेश असावा. उष्णतेवर मात करण्यास आणि त्यातील अँटी-ऑक्सिडंट्समुळे आरोग्याला उपयुक्त ठरतात. उन्हाळ्यात उपलब्ध असणारी फळे आणि भाज्यांचा आहारात समावेश ठेवल्यास जीवनसत्वे, खनिजे, फायबर, पाणी मिळून आपली कार्यक्षमता वाढते.

### दही -

उन्हाळ्यात आहारामधल्या प्रथिनांचा समावेश कमी होतो. नॉनव्हेज पदार्थ पचायला जड असल्याने त्यांचे सेवन आहारात कमी असावे. दही किंवा सैंधव (काळे मीठ) आणि जिरे पूड टाकून बनवलेल्या ताकामधून आपल्याला प्रोटीन्स मिळतात. आणि त्यामुळे वजन घटण्यास मदत होते. ताज्या दह्यामधून शरीरास आवश्यक असलेले घटक मिळून पचनशक्ती सुधारते.

### सरबते आणि पेये-

उन्हाचा त्रास होऊन खूप गरम व्हायला लागले की सॉफ्ट ड्रिंक्स, कोल्ड कॉफी किंवा फ्रीजमधील थंड पाण्याची बाटली तोंडाला लावणे ही आजची खास 'इन थिंग' आहे. मात्र या कार्बोनेटेड आणि कॅफीनेटेड पेयांमुळे शरीर अधिक पाणी उत्सर्जित करते. त्यामुळे डीहायड्रेशन होऊन शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे जास्त थकवा येतो. त्यामुळे सॉफ्ट ड्रिंक्स ऐवजी लिंबू सरबत, ताक, शहाळे, पन्हे, फळांची सरबते, घरी तयार केलेले ताज्या फळांचे ज्यूस, भाज्यांचा रस अधिक चांगले. या पेयात नैसर्गिक सोडियम, पोटॅशियम असल्यामुळे घामाद्वारे शरीरातून बाहेर पडणारे क्षार भरून काढले जातात. ठराविक वेळाने या पेयांचा आस्वाद घेतल्यास त्याचा फायदा होतो.

## शॉर्ट न्यूज

### वाळू वाहतूक करणाऱ्यांवर भडगाव पोलीसांची धडक कारवाई

**भडगाव ।** अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाळू तस्करांविरोधात पोलिसांनी आपली मोहीम तीव्र केली आहे. भडगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत जुना वाक रस्त्यावरील विट भट्टीजवळ विनापरवाना अवैध वाळूची चोरटी वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर पोलिसांनी रंगेहात पकडला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ४ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. भडगाव शहरातील विटभट्टीजवळून अवैधरित्या वाळूची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्यासची माहिती भडगाव पोलीसांना मिळाली. त्यानुसार पोलीसांनी १८ मे रोजी पहाटे ४ वाजता कारवाई करत विनाक्रमांकाचे ट्रक्टर पकडले. चालकाची कसून चौकशी केली असता चालकाकडे कोणताही परवाना नसल्याचे दिसून आले.

## सहवेदना

### मनोहर सदाशिव भालेराव



**भुसावळ ।** येथील मामाजी टॉकीज जवळील रहिवासी मनोहर सदाशिव भालेराव (वय ४८ वर्षे) (मुळ रा. धामणगाव, ता. जि. जळगाव) यांचे आज सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता भुसावळ तहसील कचेरीजवळ अकस्मात निधन झाले. त्यांचे पश्चात आई, १ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. ते ईश्वर भालेराव यांचे भाऊ होत.

# बोदवड पंचायत समिती घरकुल योजनेत मोठा घोटाळा!

**बनावट जिओ टॅग करून शासनाची लाखो रुपयांची फसवणूक**

। बोदवड ✍ प्रतिनिधी।




बोदवड पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय घरकुल योजनांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संगनमत करून शासनाची आणि खऱ्या गरजूंची मोठी फसवणूक केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. प्रत्यक्ष जागेवर घरकुलांचे कोणतेही बांधकाम झालेले नसताना, बोगस फोटो काढून आणि बनावट जिओ टॅगिंग करून या योजनांचे काम पूर्ण झाल्याचे ऑनलाईन संकेतस्थळावर दाखवण्यात आले आहे. लाभार्थ्यांकडून मोठा आर्थिक मलिदा लाटून अपूर्ण कामांचेही देयके अदा करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी तक्रारदार गजानन कडू गवळी यांनी गटविकास अधिकारी रमेश बी. सपकाळे आणि बांधकाम विभागाचे शाखा अभियंता बागुल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

या संदर्भात प्राप्त माहितीनुसार, बोदवड पंचायत समितीच्या ग्रामीण घरकुल गृहनिर्माण योजना विभागात कार्यरत असलेले गृहनिर्माण अभियंता लोकेश सरोदे, जीवन पाटील आणि गजानन पाटील हे तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना, मोदी आवास योजना आणि शबरी आवास योजना या सर्वच योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता करत असल्याचे समोर आले आहे. हे कंत्राटी अभियंते प्रत्यक्ष घटनास्थळी न जाता, चुकीच्या जागांचे जिओ टॅग करून परस्पर बोगस फोटो ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करत आहेत. सन २०२१-२२ पासून आजतागायत तालुक्यातील अनेक घरकुलांची कामे अपूर्ण अवस्थेत असतानाही त्यांचे पूर्ण पेमेंट कशाच्या आधारे वर्ग करण्यात आले, असा सवाल आता उपस्थित केला जात असून या भ्रष्टाचाराला पंचायत समितीचे संबंधित आर. एच.ई. अधिकारीच सर्वस्वी जबाबदार असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

शासकीय नियमांनुसार घरकुल योजनेचा शेवटचा हप्ता वितरित करण्यापूर्वी संबंधित जागेचा नमुना नंबर आठचा उतारा घेणे कायदेशीररीत्या बंधनकारक असते. मात्र, बोदवड पंचायत समितीत कोणत्याही प्रकारचे उतारे न घेताच कंत्राटी अभियंत्यांनी चुकीच्या पद्धतीने जिओ टॅग फोटो अपलोड करून शासनाचा लाखो रुपयांचा निधी वर्ग केला आहे. यामुळे खऱ्या गरजू लाभार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असून शासकीय निधीचा सर्रास अपव्यय झाला आहे. या कल्याणकारी योजनांचा बोदवड तालुक्यात पुरता बोजवारा उडाला असून 'दूध का दूध आणि पाणी का पाणी' करण्यासाठी गटविकास अधिकारी रमेश सपकाळे यांनी स्वतः आपल्या शासकीय दौऱ्यात किमान एका गावातील १० घरकुलांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन चौकशी करावी, जेणेकरून या रॅकेटचा पर्दाफाश होईल आणि गरीब लाभार्थ्यांना न्याय मिळेल, अशी आग्रही मागणी गजानन गवळी यांनी केली आहे.

# आता प्रत्येक बुधवारी पाळला जाणार 'नो-व्हेईकल डे'; महापौर दिपमाला काळे



**जळगाव ।** जागतिक पातळीवरील घडामोडींमुळे उद्भवलेल्या इंधन टंचाईवर मात करण्यासाठी आणि शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जळगाव महानगरपालिकेने एक महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. महानगरपालिकेत आता प्रत्येक महिन्याच्या दर बुधवारी 'नो-व्हेईकल डे' पाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जळगाव शहराच्या महापौर दिपमाला काळे यांनी या संदर्भात महानगरपालिका आयुक्तांना लेखी पत्राद्वारे तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असून, यामुळे शासकीय वर्तुळातून पर्यावरण रक्षणाचा एक नवा संदेश दिला जाणार आहे. सध्या जागतिक पातळीवर अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशात मोठ्या प्रमाणावर इंधन टंचाई भासत आहे. या गंभीर पार्श्वभूमीवर इंधनाचा अत्यंत काटकसरीने वापर करणे आणि वाढत्या प्रदूषणापासून जळगाव शहराचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही इंधनाअभावी शासकीय वाहनांचा वापर मर्यादित आणि काटकसरीने करण्याच्या सूचना सर्वच पातळ्यांवर दिल्या आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत देशातील अनेक मान्यवरांनी आपल्या सुरक्षा ताफ्यातील वाहनांची संख्या कमी केली असून, इलेक्ट्रॉनिक वाहनांचा वापर वाढवला आहे. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून जळगाव मनपा प्रशासनाने शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी आणि इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दर बुधवारी कार्यालयात येण्या-जाण्यासाठी विविध पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांनी बुधवारी वैयक्तिक पेट्रोल किंवा डिझेल गाड्यांचा वापर टाळून सायकल अथवा इलेक्ट्रॉनिक वाहनांचा (ई-बाईक्स) वापर करावा, असे आदेशात म्हटले आहे. ज्या कर्मचाऱ्यांना हे शक्य नाही, त्यांनी बस सेवा किंवा ऑटो रिक्षा यांसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य देणे बंधनकारक राहील. तसेच एकाच मार्गावर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी 'व्हेईकल शेअरिंग' म्हणजेच वाहन भागीदारीचा पर्याय निवडावा, जेणेकरून एकाच गाडीतून अनेक जण प्रवास करू शकतील आणि इंधनाची मोठी बचत होईल. जळगाव मनपाने यापूर्वीही अशा प्रकारचे पर्यावरणपूरक धोरण राबवून राज्यात आदर्श निर्माण केला होता.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर दोन वर्ष अत्याचार

**जळगाव ।** लग्नाचे खोटे आमिष दाखवून एका २३ वर्षीय तरुणीवर गेल्या दोन वर्षांपासून वेगवेगळ्या हॉटेल्स आणि लॉजवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना जळगाव शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात बलात्कार, मारहाण आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मूळची जळगावची असणारी आणि सध्या पुणे येथील वारजे भागात नोकरीनिमित्त राहणारी २३ वर्षीय पीडित तरुणी आणि संशयित आरोपी रोशन मुकेश निकम (वय ३३ वर्षे, रा. निमखेडी, जळगाव) हे परिचयाचे होते. संशयित आरोपी रोशन याने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढले. त्यानंतर मार्च २०२४ ते मे २०२६ या कालावधीत त्याने जळगाव शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी तरुणीला नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

काही दिवसांपूर्वी पीडितेने रोशनकडे लग्नाबाबत विचारणा केली असता, त्याने लग्नास साफ नकार दिला. दरम्यान, आरोपी रोशनचे दुसऱ्या एका मुलीसोबत प्रेमसंबंध (अफेअर) सुरू असल्याची माहिती पीडितेला मिळाली. याबाबीचा जाब विचारण्यासाठी पीडित तरुणी गेली असता, संशयित आरोपीने तिला बेदम मारहाण केली आणि अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडित तरुणीने जळगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कर्मचारी हे करीत आहे.

# जळगावात पोलीस प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांची पहिलीच समन्वय बैठक

**जळगाव ।** शहरात पोलीस प्रशासन आणि विविध स्वयंसेवी संस्था यांच्यात पहिल्यांदाच समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. बैठक पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी समाजातील वाढत्या सामाजिक, सायबर आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी पोलीस यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. बैठकीत समाजातील विविध संवेदनशील विषयांवर संयुक्त उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीत पोलीस दलाचे 'अधिकार' आणि स्वयंसेवी संस्थांचा 'सेवाभाव' यांचा समन्वय हा काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच समाजामध्ये जाऊन जनजागृती, समुपदेशन, पुनर्वसन आणि सामाजिक प्रश्नांवर थेट काम करण्यासाठी एनजीओंची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते, असे सांगण्यात आले. पोलीस आणि समाज यांच्यात विश्वासाचा दुवा म्हणून स्वयंसेवी संस्था प्रभावीपणे काम करू शकतात, यावरही भर देण्यात आला. महिला व बाल सुरक्षेच्या विषयावर चर्चा करताना कौटुंबिक हिंसाचार, महिलांवरील अत्याचार, पीडितांचे समुपदेशन आणि मानसिक आधार यासाठी संयुक्त प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले. बाल संरक्षण, बालहक्क आणि बालकांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांविषयी जनजागृती मोहिमा राबविण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच रेल्वे स्टेशन, बसस्थानक परिसरातील बालकांसाठी विशेष मोहिमा आणि 'ऑपरेशन मुस्कान'सारख्या उपक्रमांमध्ये एनजीओंचे सहकार्य घेण्यावर भर देण्यात आला.



» **अंमली** पदार्थ व व्यसनमुक्तीच्या मुद्द्यावर शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संयुक्त जनजागृती मोहिमा राबविणे, व्यसनमुक्ती केंद्रांच्या माध्यमातून पुनर्वसन करणे आणि तरुण पिढीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्याचे ठरले. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर डिजिटल फसवणूक, ऑनलाइन ठगी आणि सायबर सुरक्षेबाबत ग्रामीण भागात तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यावर एकमत झाले. रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक नियमांविषयी जनजागृती, संयुक्त रस्ते सुरक्षा मोहिमा आणि अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये तातडीची मदत मिळावी यासाठी स्वयंसेवकांचे नेटवर्क तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. सण, यात्रा आणि मोठ्या कार्यक्रमांदरम्यान ट्रॅफिक व गर्दी नियंत्रणासाठी स्वयंसेवकांची मदत घेऊन पोलिसांवरील ताण कमी करण्याची संकल्पनाही मांडण्यात आली. समुदाय पोलीसिंग अधिक प्रभावी करण्यासाठी शांतता समित्या आणि मोहल्ला समित्यांमध्ये एनजीओ प्रतिनिधींना स्थान देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. 'पोलीस मित्र' या संकल्पनेअंतर्गत स्वयंसेवकांचा स्वतंत्र डेटाबेस तयार करून आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक उपक्रम आणि विशेष मोहिमांमध्ये त्यांचा सहभाग वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. घरगुती हिंसाचार, झजउङ्ज प्रकरणे आणि आत्महत्याग्रस्तांना मानसिक आधार देण्यासाठी तज्ज्ञ समुपदेशकांची मदत घेण्यावर भर देण्यात आला.

# पोलिसांचा स्तुत्य पुढाकार; 'पोलीस काका-पोलीस दीदी' योजनेअंतर्गत विशेष कार्यशाळा

**जळगाव ।** शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी आणि त्यांच्या मनातील पोलिसांबद्दलची भीती दूर करून विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी जळगाव जिल्हा पोलिसांमार्फत एक पाऊल पुढे टाकण्यात आले आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या 'कम्युनिटी पोलिसिंग'चा एक भाग असलेल्या 'पोलीस काका / पोलीस दीदी' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, पोलीस अधीक्षक कार्यालयात सर्व संबंधित पोलीस अंमलदारांची एक दिवसीय विशेष कार्यशाळा नुकतीच पार पडली. या कार्यशाळेत पोलीस अधिक्षक श्रीकांत ढिवरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत 'चैतन्य वेल्नेस बीइंग अँड कौन्सिलिंग'च्या संस्थापिका डॉ. सोनल खलाने आणि डॉ. रेणुका चव्हाण यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून पोलीस कर्मचाऱ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. लहान शालेय मुलांशी संवाद कसा साधावा, त्यांचे समुपदेशन (कौन्सिलिंग) कसे करावे, आणि एखादी अनुचित घटना घडल्यास कायदेशीर चौकटीत राहून 'SOP' (Standard Operating Procedure) कशी राबवावी, याचे सविस्तर प्रशिक्षण या वेळी देण्यात आले. कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे पोलिसांना अधिक प्रभावीपणे काम करता यावे, यासाठी विविध प्रात्यक्षिके (डेमो) आणि 'रोल प्ले' (नाट्यीकरण) करून घेण्यात आले.




**अशी असणार 'पोलीस काका / पोलीस दीदी' योजना :**

» **विद्यार्थ्यांना** ईव्ह-टीझिंग (छेडछाड), रॅगिंग, ड्रग्ज, सायबर गुन्हे आणि हिंसाचार यांसारख्या धोक्यांपासून सुरक्षित ठेवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाळांसाठी पोलीस कॉन्स्टेबल (PC) ते असिस्टंट सब-इन्स्पेक्टर (ASI) दर्जाच्या कर्मचाऱ्यांची 'पोलीस काका' किंवा 'पोलीस दीदी' म्हणून नियुक्ती केली जाईल. मुलींच्या शाळांसाठी विशेषतः 'पोलीस दीदी'ची नियुक्ती असेल. एका कर्मचाऱ्याकडे साधारण २ ते ३ शाळांची जबाबदारी दिली जाईल. या संपूर्ण योजनेवर संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (PI) देखरेख ठेवतील, तर एका पोलीस उपनिरीक्षकाची 'नोडल अधिकारी' म्हणून नेमणूक करण्यात येईल. जलद समन्वयासाठी व्हॉट्सप ग्रुपचा वापर केला जाईल. शाळेच्या परिसरात छेडछाड किंवा इतर त्रास झाल्यास 'पोलीस काका/दीदी' तातडीने बीट मार्शल, बीट स्टाफ किंवा 'दामिनी पथका'च्या मदतीने कठोर कारवाई करतील.

# पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळ्याखालील चंबुतरा खाली असलेले अंदाणी नाव हटवा

**जळगाव ।** शहर मनपा प्रशासनाने प्रशासन काळात चौक व रस्ते सु शोभणीकरणाच्या नावे व्यवसायिक व कंपना यांच्या शी हात मिळवून करुन मोठ्या प्रमाणात स्वताचे खिसे भरण्याचे काम केलेले दिसून येते असून यात मोठ्या प्रमाणात व्यवसायिक कंपन्या चा फायदा व मनपा चे आर्थिक नुकसान केल्याचे दिसून येते आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळ्यापासून ते रेल्वे स्टेशन पर्यंत तसेच गोविंदा रिक्षा स्टाप वं नटवर सिनेमा थिएटर पर्यंत रस्ते विभाजक व चौक सुशोभीकरणाचे काम ओरिएंट कंपनी (अदाणी सिमेंट) कंपनीला विस वर्षे पासून देण्यात आले असून अल्प प्रमाणात पैसा खर्च करून सदर कंपनी मनमानी पद्धतीने कंपनी ची जाहिरात करित आहे मनपाने त्याना संपूर्ण रस्ते आंदण दिल्या सारखे व कंपनीने ते विकत घेतल्या सारखे वागत आहे मनपा करारा नुसार रस्ते विभाजक व चौक सुशोभीकरण करणे व त्या ठिकाणी जाहिरात फलक लावणे एवढेच अभिप्रेत होते परंतु सदर कंपनी ने तेथे असलेल्या पुतळ्या जवळील सर्कल तोडून लहान करुन टाकल्याने वाहतूकीसाठीअडथळा होत आहे त्यामुळे अपघाताची संख्या वाढली आहे व त्याही पुढे जाऊन कंपनीने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या चंबुतऱ्या खाली त्यांच्या कंपनी चे नाव असलेले दगडी फलक (ग्रेनाईट) फिक्स करून जाहिरात करीत असल्याने पुतळ्याचे विदृपीकरण झाले आहे वास्तविक पुतळा उभारण्यात कंपनी चे काही योगदान नसताना त्याठिकाणी कंपनी ची जाहिरात करणे योग्य नव्हे तरी सदर पुतळ्या खालील चंबुतऱ्या खाली कंपनी चे नाव असलेले दगड फलक काढावे न काढल्यास मनपा विरुध्द आंदोलन करण्यात येईल अशा इशारा अशोक लाडवंजारी, सुनिल भैय्या माळी, राजुभाऊ मोरे, किरणभाऊ राजपूत, मजहर पठाण, रिकू चौधरी, सुहास चौधरी, भल्ला तडवी, रहिम तडवी यांनी दिला आहे

# निमखेडी खुर्द येथे शॉर्टसर्किटमुळे भीषण आग ; शेतकऱ्याचे लाखोंमध्ये नुकसान

। मुक्ताईनगर ✍ प्रतिनिधी।

**मुक्ताईनगर** तालुक्यातील निमखेडी खुर्द गावात शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत एका तरुण शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या आगीत पवन दामोदर चिखलकर यांच्या शेतातील शेणखत, पीक व पशू मोठ्या प्रमाणात जळून खाक झाले असून, परिसरात भयाक्रांत वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गावाजवळील शेतामध्ये डीपीजवळ शेणखत साठवले होते. अचानक झालेल्या शॉर्टसर्किटमुळे ठिणग्या पडल्याने शेणखताला आग लागली आणि काही क्षणांत आग प्रचंड स्वरूप धारण केली. या आगीत पवन दामोदर चिखलकर यांचे दहा बकऱ्या तसेच चार ते पाच बकऱ्यांची पिल्ले जळून मरण पावली. तसेच गहू, ज्वारी यासह शेतीसाठी लागणारे ठिबक सिंचन साहित्य व इतर महत्त्वाचे शेती साहित्यही जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच बोदवड येथील अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग विझविण्यासाठी तातडीने काम सुरू केले. पोलीस प्रशासनही घटनास्थळी पोहचले आणि गावकऱ्यांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. नागरिकांनी घरोघरी पाणी उभारून या आगीवर नियंत्रण मिळवले. ग्रामस्थांनी शेतकऱ्याच्या मोठ्या आर्थिक नुकसानाबाबत चिंता व्यक्त केली असून, नुकसान पंचनाम्याद्वारे तातडीने शासकीय मदत देण्याची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाने देखील या घटनेची दखल घेत मदतीसाठी त्वरित पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

# मुक्ताईनगर तालुक्यात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा

**मुक्ताईनगर ।** मुक्ताईनगर शहरासह संपूर्ण तालुक्यात पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अचानक निर्माण झालेल्या इंधनटंचाईमुळे वाहनचालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांना इंधनासाठी एका पेट्रोल पंपावरून दुसऱ्या पंपावर हेलपाटे मारावे लागत आहेत. परिणामी शहरातील तसेच ग्रामीण भागातील दैनंदिन जनजीवनावर याचा परिणाम होताना दिसून येत आहे. तालुक्यातील काही मोजक्या पेट्रोल पंपांवर पेट्रोल उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहतूक वाहनांच्या मोठ्या गर्दीमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही नागरिकांनी सकाळपासून अनेक तास रांगेत उभे राहूनही इंधन न मिळाल्याची नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, तालुक्यातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल उपलब्ध नाही तसेच काही ठिकाणी पेट्रोल व डिझेल उपलब्ध नाही असे फलक लावण्यात आले आहेत.

# जामनेरमध्ये मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

**जामनेर ।** राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त जामनेर शहर भाजपा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात तब्बल ६६ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. जामनेर शहरात पार पडलेल्या या रक्तदान शिबिरात विविध क्षेत्रातील नागरिक, भाजपा कार्यकर्ते आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली. या शिबिराला लोकनियुक्त नगराध्यक्षा साधनाताई महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, जामनेर एज्युकेशन सोसायटीचे सचिव जितेंद्र पाटील, आतिश झाल्टे, नवल पाटील, मंडळ अध्यक्ष रवींद्र झाल्टे, उपनगराध्यक्ष डॉ. प्रशांत भोंडे, दिपक तायडे आणि सुभाष पवार यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



» **रक्तदान** शिबिरादरम्यान नागरिकांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. अपघातग्रस्त, गंभीर रुग्ण तसेच शस्त्रक्रियेसाठी रक्ताची गरज असणाऱ्या रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. युवकांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा आणि नियमित रक्तदानाची सवय लावावी, असे आवाहनही करण्यात आले. शिबिराच्या आयोजनासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली होती. रक्तदात्यांची नोंदणी, आरोग्य तपासणी आणि रक्तसंकलनाची प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे सामाजिक एकात्मता आणि सेवाभाव अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरातून सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देण्यात आला. मोठ्या संख्येने झालेल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णांना मदत होणार असून, अशा समाजोपयोगी उपक्रमांमुळे युवकांमध्ये सेवाभाव आणि जनजागृती निर्माण होण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

# जळगावात हातगाडी मुक्ती अभियान सुरू

**छोट्या उद्योजकांना इलेक्ट्रिक रिक्षाद्वारे व्यवसाय वाढीची संधी**

। जळगाव ✍ प्रतिनिधी।

शहर आणि जिल्ह्यात हातगाडीच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या छोट्या उद्योजकांना आधुनिक व्यवसायाची नवी दिशा देण्यासाठी मराठी प्रतिष्ठानतर्फे हातगाडी मुक्ती अभियान सुरू करण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून हातगाडी लोटणाऱ्या व्यावसायिकांचे शारीरिक श्रम कमी करून त्यांचा व्यवसाय अधिक वेगाने वाढविणे आणि आर्थिक उत्पन्नात वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मराठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. जमील देशपांडे यांनी दिली. आजही शहरातील अनेक छोटे उद्योजक आणि फेरीवाले हातगाडीच्या साहाय्याने व्यवसाय करत असून, रोजच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना प्रचंड मेहनत घ्यावी लागते. उन्हाळ्याची तीव्रता, पावसाळ्यातील अडचणी आणि थंडीच्या वातावरणातही दिवसभर हातगाडी लोटत व्यवसाय करावा लागत असल्याने या व्यावसायिकांना शारीरिक तसेच मानसिक ताणाला सामोरे जावे लागते. अशा कष्टकरी उद्योजकांना सुलभ आणि आधुनिक पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी मराठी प्रतिष्ठानने पुढाकार घेतल्याचे सांगण्यात आले.



» **या अभियानांतर्गत** पात्र व्यावसायिकांना इलेक्ट्रिक रिक्षा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इलेक्ट्रिक रिक्षामुळे व्यवसाय अधिक वेगाने आणि कमी श्रमात करता येणार असून, कमी वेळेत अधिक ठिकाणी पोहोचण्याची सुविधा मिळणार आहे. त्यामुळे छोट्या उद्योजकांच्या व्यवसाय क्षमतेत वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. मराठी प्रतिष्ठानकडून या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांना आवश्यक शासकीय सबसिडी मिळवून देण्यासाठीही विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यावसायिकांना सक्षम करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होणार असल्याचे ड. जमील देशपांडे यांनी स्पष्ट केले. या अभियानामुळे छोट्या उद्योजकांचे शारीरिक श्रम मोठ्या प्रमाणात कमी होतील, त्यांचा वेळ आणि ऊर्जा वाचेल तसेच व्यवसायातील उत्पन्न वाढण्यास मदत होईल. त्याचबरोबर पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरामुळे शहरात स्वच्छ आणि हरित व्यवसाय संस्कृतीला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले. हातगाडी मुक्ती अभियान अंतर्गत नाव नोंदणी प्रक्रिया २५ मे २०२६ पासून सुरू होणार असून, इच्छुक व्यावसायिकांनी मराठी प्रतिष्ठानच्या गणपती कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शहरातील कष्टकरी लघुउद्योजकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासोबतच त्यांच्या व्यवसायाला आधुनिकतेची जोड मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

# युद्धाचे परिणाम

अमेरिका-इराण यांच्यात शस्त्रसंधी लागू असतानाही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर पुन्हा हल्ला करण्याची धमकी दिल्याच्या पार्श्वभूमीवर या दोन देशांमधील थेट लष्करी आणि आर्थिक संघर्ष अत्यंत चिंताजनक वळणावर पोहोचला आहे. या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला बसलेला फटका भीषण असून त्याचे पडसाद जगाच्या कानाकोपऱ्यात उमटत आहेत. या संकटाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी युद्धापूर्वीची आणि सद्यपरिस्थिती पाहणे आवश्यक आहे. युद्धापूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारात असलेले कच्च्या तेलाचे दर विक्रमी पातळीवर पोहोचल्याने जागतिक स्तरावर तीव्र चलनफुगवटा आणि आर्थिक मंदीचे सावट पसरले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील तिढ्यामुळे केवळ ऊर्जा पुरवठाच नाही, तर अन्न सुरक्षेलाही मोठा तडा गेला आहे. भारतासाठी हा संघर्ष केवळ एका परकीय प्रांतातील लष्करी घडामोड नसून भारताच्या राष्ट्रीय आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंधांना पडलेले मोठे खिंडार आहे. भारताची ८० टक्क्यांपेक्षा जास्त खनिज तेलाची आणि गॅसची आयात इराणच्या आखातातून होते आणि इराणच्या क्रांती दलाकडून या जलमार्गावर सातत्याने होणाऱ्या हल्ल्यांमुळे भारताची कोंडी झाली आहे. भारताचा महत्त्वाकांक्षी 'चाबहार बंदर' प्रकल्प आता अत्यंत गंभीर चक्रव्यूहात अडकला आहे. २०१८ पासून भारताला चाबहार बंदराच्या विकासासाठी अमेरिकेकडून मिळालेली विशेष निर्बंध सवलत दोन महिन्यांपूर्वी अधिकृतपणे संपुष्टात आली. अमेरिकेने ही सवलत रद्द केल्याने भारताचे आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरचे नियोजन आणि पाकिस्तानला वळसा घालून मध्य आशिया आणि युरोपशी जोडले जाण्याचे स्वप्न संकटात आले आहे. भारताच्या यंदाच्या अर्थसंकल्पात चाबहार प्रकल्पासाठी निधीची तरतूद न केल्याने भारत या प्रकल्पातून बाहेर पडतो आहे की काय, अशी शंका व्यक्त केली जात होती. मात्र, भूराजकीय तज्ज्ञांच्या मते ही भारताची कायमची माघार नसून केवळ एक 'तात्कालिक धोरणात्मक शांतता' आहे. कारण भारत तिथून बाहेर पडल्यास ती पोकळी चीन तत्काळ भरून काढेल. या पार्श्वभूमीवर भारताला आपले आर्थिक हितसंबंध राखण्यासाठी स्वतःचे मुत्सद्दी धोरण आखणे भाग पडले आहे. हा संघर्ष कुणालाही लष्करी बळाचा वापर करून किंवा केवळ हवाई हल्ल्यांद्वारे राजवट बदलून थांबवणे अशक्य आहे. युद्ध थांबवण्यासाठी अत्यंत वास्तववादी आणि बहुपक्षीय राजनैतिक उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. तातडीचा उपाय म्हणजे होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी उठवणे हा आहे. अलीकडेच अमेरिकेने 'ऑपरेशन प्रोजेक्ट फ्रीडम' सुरू करून स्वतःच्या बळावर हा जलमार्ग खुला करण्याचा प्रयत्न केला असता इराणी नौदलाने केलेल्या जहाजांवरील हल्ल्यांमुळे ही मोहीम अवघ्या काही दिवसांत स्थगित करावी लागली. यावरून स्पष्ट होते की लष्करी बळाचा वापर करून होर्मुझ सामुद्रधुनी खुली करणे अशक्य आहे. याऐवजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेच्या छत्राखाली एक बहुराष्ट्रीय सागरी परिषद बोलावून होर्मुझला 'मुक्त वाहतूक क्षेत्र' म्हणून घोषित केले पाहिजे. जेणेकरून जागतिक अन्न आणि ऊर्जा सुरक्षा अबाधित राहील. या सर्व प्रक्रियेत पाश्चात्य देशांऐवजी आशियाई महासत्तांची मध्यस्थी अत्यंत कळीची ठरेल. पाकिस्तानने केलेली मध्यस्थी आणि इस्लामाबाद वाटाघाटी अपयशी ठरल्या असल्या तरी इराणमध्ये भारताची असलेली स्वच्छ प्रतिमा आणि संतुलित परराष्ट्र धोरण अत्यंत उपयुक्त ठरू शकते. भारत, चीन आणि रशिया यांनी संयुक्तपणे मध्यस्थी केल्यास अमेरिकेच्या आक्रमकतेला लगाम घालता येईल आणि इराणलाही मुख्य प्रवाहात आणता येईल. अमेरिका-इराण संघर्ष हा केवळ दोन देशांमधील राजकीय संघर्ष नाही तर तो जागतिक स्थैर्याशी जोडलेला प्रश्न आहे. प्रत्येक नव्या चकमकीमुळे व्यापक युद्धाचा धोका वाढतो आहे. संवाद, संयम आणि मुत्सद्देगिरी हाच या संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग आहे. जग आधीच अनेक संकटांना सामोरे जात असताना आणखी एक मोठे युद्ध परवडणारे नसल्याने अमेरिका आणि इराण दोघांनीही सामरिक शक्तिप्रदर्शनापेक्षा शांततेचा मार्ग निवडणे ही काळाची गरज आहे. अमेरिकेने इराणचे अस्तित्वच पुसून टाकण्याच्या धमक्या देणे तत्काळ बंद केले पाहिजे आणि इराणनेही शेजारील अरब राष्ट्रांवर आणि जागतिक पुरवठा साखळीवर हल्ले करणे थांबवले पाहिजे. या युद्धात कोणाचाही विजय होणार नसून संपूर्ण मानवतेचाच पराभव होणार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकच मार्ग शिल्लक आहे आणि तो म्हणजे टप्प्याटप्प्याने निर्बंध उठवणे, इराणच्या सार्वभौमत्वाचा आदर करणे आणि आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली इराणच्या अणुकार्यक्रमावर दीर्घकालीन मर्यादा घालणे. या महाभयंकर भूराजकीय खेळात भारताने केवळ स्वतःचा बचाव न करता एक जागतिक शांतातादूत म्हणून आपली ऐतिहासिक भूमिका बजावणे हीच काळाची गरज आहे.

> युद्ध थांबवण्यासाठी अत्यंत वास्तववादी आणि बहुपक्षीय राजनैतिक उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. तातडीचा उपाय म्हणजे होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी उठवणे हा आहे.

## मनन चिंतन


ह.भ.प. देवदत्त परुळेकर



### खरे सौंदर्य

**उपजतां बरें दिसे। रूप वाढतां तें नासे॥**

तुकाराम महाराज किती नेमकं सांगतात! काही गोष्टी सुरुवातीला खूप सुंदर दिसतात, पण जसजशा वाढतात, तसतसं त्यांचं खरं रूप समोर येतं आणि ते अनेकदा निराशाजनक असतं. आपण रोजच्या आयुष्यात हे पाहतो. नवीन मोबाईल घेतला की किती आनंद होतो! पहिल्या काही दिवसांत तो आपल्याला खूप आवडतो. पण काही दिवसांनी त्याचं आकर्षण कमी होतं. नवीन नातंही असंच सुरुवातीला सगळं गोड, पण वेळ गेल्यावर स्वभाव दिसायला लागतो. म्हणजेच, बाह्य सौंदर्य किंवा सुरुवातीचा चमकदारपणा कायम टिकत नाही. याच्या अगदी उलट उदाहरण म्हणजे लता मंगेशकर.



लतादीदींचा आवाज सुरुवातीला काही जणांना "खूप बारीक" वाटायचा. त्या काळात भारी, घन आवाजाला जास्त महत्त्व होतं. अनेकांनी त्यांना नाकारलं. जर त्यांनी त्या टीकेकडे पाहून आपला मार्ग बदलला असता, तर कदाचित त्या इथे पोहोचल्या नसत्या. पण त्यांनी एक गोष्ट ठरवली मी माझ्या कलेवर प्रेम करणार आणि तिला घडवत राहणार. त्या दररोज रियाज करत राहिल्या. तासन्‌तास साधना, शिस्त, संयम हे सगळं त्यांच्या आयुष्याचा भाग बनलं. काय घडलं मग? जसं जसं त्यांचं वय वाढत गेलं, तसं तसं त्यांचा आवाज अधिक परिपक्व, अधिक सुंदर, अधिक भावपूर्ण होत गेला. आजही त्यांचा आवाज ऐकला की मन थेट स्पर्शून जातं. इथेच तुकोबांचा संदेश उलटा प्रकाश टाकतो काही गोष्टी सुरुवातीला सुंदर वाटतात, पण नंतर नासतात. पण काही व्यक्ती अशी असतात की त्या वेळेनुसार आणखी सुंदर होत जातात, कारण त्यांचं सौंदर्य बाहेरचं नसतं, ते आतलं असतं. आपल्या आयुष्यातही हेच लागू होतं. आपण बाह्य गोष्टींवर भर देतो कपडे, दिसणं, स्टाईल. पण स्वभाव, मूल्यं, शिस्त हे घडवायला वेळ देत नाही. मग काय होतं? सुरुवातीला आपण "छान" वाटतो. पण हळूहळू लोकांना आपलं खरं रूप दिसायला लागतं. तुकाराम महाराज आपल्याला सांगतात खरं सौंदर्य हे वाढत जातं, नासून जात नाही. म्हणून स्वतःला विचारू या आपण फक्त सुरुवातीला चांगले दिसतोय का, की वेळ जाईल तसं अधिक चांगले होत आहोत? कारण शेवटी लोकांना आठवतं ते आपलं रूप नाही. तर आपला स्वभाव आणि प्रभाव!

## मत आमचेही



केशव उपाध्ये

# स्वयंनियमनाचे आवाहन आणि पोटशूळ

**सामान्य माणूसही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो असा आजवरचा अनुभव आहे. यावेळीही सामान्य माणूस इंधन बचतीचे आणि सोने खरेदीवर नियंत्रण आणण्याचे आवाहन प्रत्यक्षात आणेल, यात शंका नाही.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आणि सोने खरेदी वर्षभर थांबवण्याचे केलेले आवाहन विरोधी पक्षांना नेहमीप्रमाणे पचले नाही. पश्चिम बंगाल आणि आसाममधील दणदणीत पराभवामुळे पंतप्रधान मोदी आणि भारतीय जनता पक्ष विरोधातील मळमळ बाहेर काढण्याची विरोधकांची संधी हुकली होती. इंधन बचतीच्या आवाहनानंतर युवराज राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देशाच्या आर्थिक स्थितीचा संदर्भ घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध गरळ ओकली. असे करून या मंडळींना समाधान वाटत असल्याने कोणाला त्याबाबत आक्षेप घेण्याचे कारण नाही. सततच्या पराभवामुळे आणि विजयाची शक्यता दृष्टिपथात नसल्यामुळे मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाविरुद्ध गैरसमज निर्माण करण्यासाठी खोटी माहिती पसरवण्याचे उद्योग काँग्रेस आणि अरविंद केजरीवाल यांच्यासारखे अन्य विरोधक सातत्याने करीत असतात. देशातील जनतेला भ्रमित करण्याच्या कुटील हेतूने हे राजकारण खेळले जाते. मात्र जनतेला गांधी व केजरीवाल यांचे कुटील राजकारण ठावूक असल्याने जनता अशा गलिच्छ राजकारणाला फारशी धूप घालत नाही व घालणार नाही. इराण-अमेरिका युद्ध सुरू झाल्यानंतर गॅस टंचाईबाबतच्या अफवा काँग्रेसने पसरवल्यामुळे गॅससाठी कशा मोठ्या रांगा लागल्या होत्या हे आपण पाहिले आहेच. एवढ्या अफवा पसरवूनही पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवलेच, त्याखेरीज आसामसारखे राज्यही मोठ्या बहुमताने स्वतःकडे राखले. विरोधकांच्या अफवा पसरवण्याचा जनतेच्या मनावर व मोदी सरकारबाबत असलेल्या दृढविश्वासावर काडीमात्र परिणाम होत नाही, हेच या निकालांनी दाखवून दिले असे म्हटले तर ते अतिरंजित किंवा अविश्वसनीय वाटणार नाही. आता पंतप्रधान मोदी यांनी इंधन वापर आणि सोने खरेदी याबाबत स्वयंनियमनाचे आवाहन केले आहे. भारतापुढे फार मोठा पेचप्रसंग उभा आहे, असा याचा अर्थ नाही. भारताकडे आगामी वर्षभरात पेट्रोल-डिझेल आणि गॅसची आयात करता येईल एवढे परकीय चलन उपलब्ध आहे. एवढ्या संकटातही भारताची अर्थव्यवस्था बळकट असल्याचेच हे द्योतक आहे. १९९० च्या दशकात परकीय चलन जवळपास संपत आल्यामुळे ज्या पद्धतीने अमेरिका, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांनी देशाला जसे वेठीला धरले होते, ते टाळण्यासाठी शक्य तेवढे परकीय चलन वाचवणे हे केंद्र सरकारचे कर्तव्य आहे. भारत ज्या वस्तूंची आयात करतो, त्या वस्तूंची आयात घटवणे आवश्यक आहे. खनिज तेल, सोने आणि खाद्यतेल हे भारतीय आयातीचे तीन प्रमुख घटक आहेत. याबाबतीत सरकारने आयातीवर किंवा या घटकांच्या वापरावर निर्बंध लादण्यापेक्षा भारतीयांनी स्वयंस्फूर्तीने या साऱ्याची बचत करणे, त्यावरील खर्च कमी करणे सुरू केले तर सरकारसमोरचे आव्हान तुलनेने सुकर होते. अशी स्वयंशिस्त व स्वयंनियंत्रणाची अपेक्षा करणे यात गैर काहीच नाही. भारतीय संस्कृतीमध्ये अशा स्वयंशिस्तीचा नेहमीच अंतर्भाव केलेला आहे. मात्र भारतीय संस्कृती, परंपरा याबाबत अनभिज्ञ असलेले विरोधकच अशा निर्णयांची हेटाळणी करू शकतात.

दररोज सुमारे ५० लाख बॅरलएवढे कच्चे तेल (क्रूड ऑइल) आपण आयात करतो. रोजचे ५० लाख बॅरल म्हणजे जवळपास ८० कोटी लिटर कच्चे तेल भारताला रोज आयात करावे लागते. याचा अर्थ आपल्या गरजेच्या जवळपास ९०% कच्चे तेल आपण आयात करतो आहे. कच्च्या तेलाची सध्याची किंमत अंदाजे १०४ डॉलर प्रति बॅरल आहे. याचाच अर्थ असा की, आपण रोज सुमारे ५२ कोटी डॉलर कच्चे तेल आयातीसाठी खर्च करतो. भारतीय रुपयांत ही रक्कम रोज सुमारे ४५०० कोटी एवढी म्हणजे वर्षाला १५ लाख कोटी रुपये होते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या एका बॅरलची किंमत समजा एक डॉलरने वाढली, तर आपल्याला १७ हजार कोटी रुपये जास्त मोजावे लागतात. डॉलरच्या तुलनेत रुपयाची एक रुपयाने जरी घसरण झाली, तरी १४ हजार कोटी रुपये जास्त लागतात. गेल्या वर्षी ६० डॉलरपेक्षा कमी असणारी कच्च्या तेलाची किंमत आज १०० डॉलरपेक्षा अधिक झाली आहे. त्यामुळे आपल्या परकीय चलन साठ्यावर किती मोठा परिणाम झाला आहे, हे आपल्या लक्षात येऊ शकते. सर्व सोंगे आणता येतात परंतु पैशाचे सोंग आणता येत नाही, अशी आपल्याकडे म्हण आहे. कदाचित विरोधकांना ती म्हण माहीत नसल्याने त्यांनी या गंभीर परिस्थितीचे आकलन करून न घेता दुगाण्या झाडण्यात धन्यता मानली.

आंतरराष्ट्रीय स्थिती लक्षात घेऊनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आर्थिक शिस्त बाळगण्याचे आवाहन केले आहे. परकीय चलन वाचवण्यासाठी शक्य ते सर्व उपाय योजा, असे पंतप्रधानांनी सांगितले आहे. दररोजच्या प्रवासासाठी एकट्याने चारचाकी चालवण्याऐवजी त्याचा सामूहिक वापर करा, चारचाकीचा वापर शक्य तेथे टाळून मेट्रो वा अन्य सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा, जेथे शक्य आहे तेथे घरूनच काम करा. अशा स्वरूपाचे पंतप्रधानांचे आवाहन आहे. सोन्याची प्रचंड प्रमाणावर होणारी आयात घटली तर देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात वाचेल. त्यामुळे पुढील वर्षभर सोन्याचे दागिने विकत घेऊ नका, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. आपला देश दरवर्षी सात लाख कोटींचे सोने आयात करतो. पेट्रोल-डिझेल, सोने रुपयाच्या चलनात खरेदी करीत असलो, तरी आंतरराष्ट्रीय बाजारात तेल आणि सोने यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार अमेरिकी डॉलरमध्येच करावा लागतो. परदेशी गेल्यावर भारतीय पर्यटकांचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्च होते. अनेक भारतीय पर्यटक विदेशात मोठ्या प्रमाणावर शॉपिंग करतात. देशातील सधन उच्च मध्यमवर्गामधील ही हौस आता लपून राहिलेली नाही. त्यामुळे शक्यतो तशा स्वरूपाचा परदेशी प्रवास टाळावा, असेही पंतप्रधान म्हणाले आहेत. या आवाहनाच्या अनुषंगाने राज्य शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मंत्री, अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापर, ऊर्जाबचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, डिजिटल माध्यमातून बैठका घेण्यावर विशेष भर दिला आहे. कार पूलिंग, सार्वजनिक वाहतूक, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल वा बसने प्रवास करण्याचे सुचविले आहे. मंत्रालय, विभागीय आणि जिल्हास्तरावरील कार्यालयीन कामकाजासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून बैठका, प्रशिक्षण, सेमिनार ऑनलाइन घेण्यावर भर देण्यात येणार आहे. सामान्य माणूसही पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो असा आजवरचा अनुभव आहे. यावेळीही सामान्य माणूस इंधन बचतीचे आणि सोने खरेदीवर नियंत्रण आणण्याचे आवाहन प्रत्यक्षात आणेल, यात शंका नाही.

**(प्रदेश उपाध्यक्ष, भाजप)**

# दररोज ४० विद्यार्थ्यांच्या आत्महत्या हे दाहक वास्तव

**केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर भर देऊन चालणार नाही. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, पालकांची स्वप्नं आणि आर्थिक भांडवल पणाला लावतात, मात्र अपयश किंवा अनिश्चिततेच्या एका क्षणात त्यांचे भविष्य अंधारात ढकलले जाते.**

## कालप्रवाह

राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (NCRB) अहवालातून देशातील तरुण आणि विद्यार्थी वर्गाच्या मानसिक आरोग्याची आणि सामाजिक दुरवस्थेची एक अत्यंत चिंताजनक आणि भयावह आकडेवारी समोर आली आहे. या अहवालानुसार, आज देशात दररोज सरासरी ४० विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवत आहेत. ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या भविष्यकाळाला लागलेली एक मोठी वाळवी आहे, ज्यावर तातडीने विचार आणि उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

गेल्या एका दशकातील आकडेवारीचा अभ्यास केल्यास, विद्यार्थी आत्महत्येचा हा आलेख अत्यंत वेगाने वर जात असल्याचे स्पष्ट दिसते. सन २०१३ मध्ये देशात ८,४२३ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली होती. मात्र, त्यानंतरच्या काळात शैक्षणिक स्पर्धा, पालकांच्या वाढत्या अपेक्षा आणि बदलती जीवनशैली यामुळे हा आकडा सातत्याने वाढत गेला. सन २०२३ मध्ये हाच आकडा १३ हजार ८९२ वर पोहोचला आणि २०२४ मध्ये त्यात आणखी वाढ होऊन तब्बल १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले. अवघ्या अकरा वर्षांत या संख्येत झालेली प्रचंड वाढ ही आपली शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक जडणघडण कुठेतरी कमी पडत असल्याचे लक्षण आहे.

सन २०२४ मधील आकडेवारीचे लिंगाधारित विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, आत्महत्या करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये मुलांचे म्हणजेच विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. यामध्ये ७ हजार ६६९ विद्यार्थी आणि ६ हजार ८१९ विद्यार्थिनींचा समावेश आहे. यावरून मुलांवर असणारे कमालीचे मानसिक दडपण स्पष्ट होते. या आत्महत्येमागील कारणांचा शोध घेतला असता, तज्ज्ञांच्या मते आजचा तरुण स्पर्धा, करिअरची अनिश्चितता, बेरोजगारी आणि कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होण्याचे प्रचंड दडपण या चक्रव्यूहात अडकला आहे.

केवळ शैक्षणिक अपयश हेच या आत्महत्येमागे एकमेव कारण नाही, तर या दुर्दैवी घटनांमागे विविध सामाजिक आणि कौटुंबिक पदर आहेत. अहवालानुसार, ३ हजार १०१ घटनांमध्ये 'कौटुंबिक समस्या' हे सर्वात मोठे कारण असल्याचे आढळले आहे. याव्यतिरिक्त, प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या नैराश्यामुळे १ हजार ६७१ विद्यार्थ्यांनी, तर तीव्र आजारपणामुळे १ हजार ३४७ विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य अकाली संपवले. तसेच, परीक्षेत अपयश आल्यामुळे १ हजार ०७१ विद्यार्थ्यांनी टोकाचे पाऊल उचलले, जे थेट आपल्या परीक्षाकेंद्री शिक्षण पद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे करते.

भौगोलिकदृष्ट्या विचार केल्यास, देशात राज्यनिहाय या समस्येची तीव्रता वेगवेगळी आहे. संपूर्ण देशात उत्तर प्रदेश याबाबतीत दुर्दैवाने आघाडीवर असून, विद्यार्थी आत्महत्येमध्ये महाराष्ट्राचे प्रमाण १३.२ टक्के इतके आहे. २०२४ च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात १ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. उत्तर प्रदेशात १ हजार ५८५, मध्य प्रदेशात १ हजार ४४७ आणि तमिळनाडूमध्ये १ हजार २८७ विद्यार्थ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली.

ही आकडेवारी हे स्पष्ट संकेत देतात की, आता केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर भर देऊन चालणार नाही. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, पालकांची स्वप्ने आणि आर्थिक भांडवल पणाला लावतात, मात्र अपयश किंवा अनिश्चिततेच्या एका क्षणात त्यांचे भविष्य अंधारात ढकलले जाते. अशा वेळी तरुण पिढीला केवळ पदव्या देण्यापेक्षा त्यांना मानसिक आधार देणे, अपयशाशी लढण्याची ताकद देणे आणि रोजगाराच्या सुरक्षित संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे. लोकशाहीत आणि सुसंस्कृत समाजात देशाच्या तरुणाईचे अशा प्रकारे कोमेजून जाणे अत्यंत वेदनादायी आहे.

## धक्के-बुक्के

**■ यूएईमध्ये अणुऊर्जा प्रकल्पावर हल्ला झाल्याने युद्धाचा भडका**

इराण-इस्रायल व अमेरिका युद्धाची ठिणगी विझण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे बहुदा इंधन दरवाढीच्या भडक्यात सारे जग होरपळणार.





**■ शक्तिपीठ महामार्गाला विरोध झालेल्या भागातून आता महामार्गाची मागणी**

शक्तिपीठकरिता ज्यांच्या जमिनी जाणार ते विरोध करणार व ज्यांच्या जमिनीच्या जवळून हा महामार्ग गेल्याने त्यांच्या जमिनीला दामदुप्पट भाव मिळणार ते महामार्ग आमच्या भागातून न्या ही मागणी करणार.

**■ जमिनीच्या वादातून सख्ख्या भावाची भिवंडीत हत्या**

जमिनीला कोट्यवधी रुपयांचे मोल आल्याने लोक रक्ताची नाती विसरली आहेत. आता एक भाऊ गेला. दुसरा तुरुंगात गेला. जमिनी भलत्याच कुणाच्या घशात जाणार. त्यापेक्षा दोघांनी समझोता केला असता तर...





**■ मोफत चित्रपट पाहण्याच्या नादात माझगावमध्ये व्यावसायिकाचे बँक खाते खाली**

मोबाईलमध्ये अनोळखी मोबाईल क्रमांकावरून येणाऱ्या लिंक व अन्य कंटेंट डाऊनलोड करू नका, अशा सूचना पोलीस वारंवार देतात, पण मोफतचा मोह सुटत नाही. तो बँकेतील लाखोंचा बॅलन्स रिता करून जातो.

**■ कोल्हापुरात जावयाला दीड किलो चांदीच्या चपला दिल्या**

कोल्हापुरी चपला या लाखमोलाच्या आहेत. पण त्याच कोल्हापुरात जावयाकरिता इतक्या वजनदार चपला केल्या. कोल्हापूरच्या माणसांचा नाद करायचा नाय हेच खरे!



## जनमनाचा कानोसा

### कोविड आणि युद्ध या एकाच नाण्याच्या दोन बाजू

**पंतप्रधानांनी** केलेले आवाहन जनतेच्या पचनी पडलेले दिसत नाही. त्यातच नेदरलँडच्या दौऱ्यात हे दशक आपत्तीचे असल्याने गरिबीचे चटके सहन करण्याचेही त्यांनी सुतोवाच केले. देशभरात त्यांच्यावर टीकेची झोड उठवली गेली. अर्थात त्यांनी केलेल्या आवाहनावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. इतिहास सगळेच लक्षात ठेवत असल्याने वेळ आणि जनतेची स्मृती, दोन्ही खूप ताकदवान असतात हेच खरे! कोविड काळात तत्कालीन मुख्यमंत्र्यांची भाजपने खिल्ली उडवली होती, पण आज नेमकी तीच पाळी सत्ताधारी भाजपवर आल्याने पचवणे मात्र जड जात आहे. कारण यापूर्वी कोविडमध्येही वेळीच सावधानता न राखल्याने देशाला नाहक त्रास सहन करावा लागला होता. दोन्ही वेळेला विरोधी पक्षनेत्याने पूर्वकल्पना देऊनही दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून आले. या वेळेलाही युद्ध सुरू असताना निवडणूक प्रचारात मग्न राहून संकटाची चाहूल लागूनही जनतेला अंधारात ठेवले गेले. ही जनतेची फसवणूक आहे. त्यांनी दिलेली वचने कशी हवेत विरून गेली हे जनता विसरलेली नाही. त्यामुळे जनतेने निर्णय घेतला तर नक्कीच सत्तापरिवर्तन होते. युद्ध आणि महामारी या काळात नागरी जीवन पार बिघडून जाते हे वास्तव असले, तरी त्यापूर्वी काही गोष्टींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असते याचे भान सर्वांनी ठेवायला हवे.

**- पांडुरंग भाबल,**
भांडुप

### खुला प्रवर्ग सर्वांसाठी खुलाच राहिला पाहिजे

**महाराष्ट्र** शासनाने मागासवर्गीय उमेदवारांनी वय, अनुभव अथवा पात्रतेमध्ये सवलत घेतल्यास त्यांना खुल्या प्रवर्गात निवड दिली जाणार नाही, असा घेतलेला निर्णय सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांवर आघात करणारा आहे. खुला प्रवर्ग हा कोणत्याही एका समाजघटकासाठी राखीव नसून, तो गुणवत्तेच्या आधारे सर्वांसाठी खुला असतो, ही लोकशाहीची भूमिका आहे. मागासवर्गीय उमेदवारांना मिळणाऱ्या सवलती या अतिरिक्त गुण देत नाहीत; त्या केवळ ऐतिहासिक व सामाजिक विषमता कमी करून समान स्पर्धेची संधी निर्माण करतात. सर्वोच्च न्यायालयानेही 'छाया विरुद्ध महाराष्ट्र राज्य' प्रकरणात स्पष्ट केले आहे की, परीक्षेत गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गाइतके गुण मिळाल्यास संबंधित उमेदवारास खुल्या गटात निवडले जाऊ शकते. शासनाचा सद्य निर्णय हा समतेच्या संविधानिक भावनेच्या विरोधात जाणारा असून, खुल्या प्रवर्गास अप्रत्यक्षपणे मर्यादित गटासाठी राखीव करण्याचा प्रयत्न असल्याची भावना समाजात निर्माण होत आहे. त्यामुळे हा निर्णय तातडीने मागे घेऊन सामाजिक न्याय, संविधानिक समता आणि लोकशाही मूल्यांचा सन्मान राखला जावा, हीच अपेक्षा.

**- सुनील सुंदराबाई धाऊ झळके,**
भिवंडी, जि. ठाणे

### ब्रिटिशकालीन जलवाहिन्या कधी बदलणार?

**पाणीगळती** रोखण्यासाठी परदेशी तंत्रज्ञान वापरणार, ही बातमी 'नवशक्ति'मध्ये वाचनात आली. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या ब्रिटिशकालीन असून, त्या जिर्ण झालेल्या आहेत, ९०० दशलक्ष लिटर पाण्याच्या गळतीसाठी त्या कारणीभूत आहेत. जलवाहिन्या बदलून नवीन टाकण्यासाठी नियोजन करावे असे का वाटत नाही?

**- प्रशांत कुळकर्णी,**
कांदिवली

जनशक्ति अर्थशक्ति

www.ejanshakti.com

जळगाव, बुधवार,२० मे २०२६ » पान ५

## बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| सोने | ₹१,६२,८०० (१० ग्रॅम) | |
| चांदी | ₹२,७६,००० (१ किलो) | |
| डॉलर ₹ | ९६.३५ | -५८ |
| सेन्सेक्स | ७५,३१५.०४ | +७७.०५ |
| निफ्टी | २३,६४९.९५ | +६.४५ |

## निवडक

### श्रीराम जनरल इन्शुरन्सच्या प्रीमियम उत्पन्नात वाढ

**मुंबई :** श्रीराम जनरल इन्शुरन्स कंपनीने चौथ्या तिमाहीत उत्कृष्ट कामगिरी केली. कंपनीचा ग्रॉस डायरेक्ट प्रीमियम वार्षिक आधारावर २१% वाढून ₹१,०९९ कोटींवरून ₹१,३३२ कोटी झाला आहे. तो इन्शुरन्स इंडस्ट्रीच्या ११% ग्रोथपेक्षा खूप जास्त आहे. या वाढीचे मुख्य कारण कंपनीचा मोटर इन्शुरन्स पोर्टफोलिओ राहिले आहे. आर्थिक वर्ष २०२६ साठी, एसजीआयचा जीडीपी वार्षिक आधारावर २४% वाढून ₹३,७५३ कोटींवरून ₹४,६३६ कोटी झाला आहे.

### कॅप्टन पॉलीप्लास्टचा अहमदाबादमध्ये प्रकल्प

**अहमदाबाद :** सूक्ष्म सिंचन क्षेत्रातील कॅप्टन पॉलीप्लास्टने गुजरातमधील अहमदाबादजवळील नव्याने बांधलेल्या मॅन्युफॅक्चरिंग प्लांटमध्ये व्यावसायिक उत्पादन सुरू केले आहे. नवीन प्लांटमुळे कंपनीची उत्पादन क्षमता वाढून अंतर्गत खर्च कमी होण्यासह नफा वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती कॅप्टन पॉलीप्लास्टचे पूर्णवेळ संचालक रितेश खिचाडिया यांनी दिली आहे.

### क्लीनमॅक्सचा नफा ४.४ पट वाढला

**मुंबई :** व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रातील नवीकरणीय ऊर्जा पुरवठादार क्लीनमॅक्स एन्व्हारो एनर्जी सोल्युशन्सने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये करानंतरचा निव्वळ नफा मागील वर्षाच्या तुलनेत ४.४ पट वाढून ८५.६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. महसूल २८ टक्क्यांनी वाढून १,९१३ कोटी रुपये झाला आहे. कंपनीने ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत ५.७ गिगावॅट क्षमतेचा करारित नवीकरणीय ऊर्जा वीजविक्री पोर्टफोलिओ उभारला आहे.

### आयडीएफसी फर्स्ट बँकेचे नवे कार्ड

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने संस्थापक, उद्योजक आणि व्यवसाय मालकांसाठी एफडी-समर्थित बिझनेस मल्टिप्लायर मेटल क्रेडिट कार्ड सादर केले आहे. प्रीमियम मेटल कार्ड व्यावसायिक खर्चासाठी स्वतंत्र क्रेडिट मर्यादेसह, बिझनेस मल्टिप्लायर क्रेडिट कार्ड व्यावसायिक आणि वैयक्तिक खर्च वेगळे ठेवण्यास मदत करू शकते, असे लॉन्चप्रसंगी, आयडीएफसी फर्स्ट बँकेचे कार्ड्स, पेमेंट्स आणि लॉयल्टी विभागाचे प्रमुख शिरीष भंडारी म्हणाले.

### जायडेक्स पेंट्सचे तंत्रज्ञान सादर

**मुंबई :** जायडेक्स पेंट्सने भारतातील पहिली 'सिलिकेट मिनरल पेंट टेक्नॉलॉजी' सादर केली आहे. या तंत्रज्ञानामुळे इमारतींना आर्द्रतेने होणाऱ्या नुकसानीपासून बचाव होतो. जायडेक्सचा सिलिकेट मिनरल पेंट भिंतीच्या पृष्ठभागाशी रासायनिकदृष्ट्या एकरूप होतो. हे तंत्रज्ञान अडकलेली वाफ बाहेर पडू देते. यामुळे ओलसरपणा आणि पोपडे येण्याची समस्या बऱ्याच अंशी कमी होते.

# काटकसर करा!

## सरकारी बँका, विमा कंपन्यांना अर्थ मंत्रालयाचे आदेश

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर, अर्थ मंत्रालयाने सोमवारी सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्थांना काटकसरीचे उपाय अवलंबण्याचे आणि इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या आठवड्यात, पंतप्रधानांनी नागरिकांना इंधनाचा न्याय्य वापर करणे, सोने खरेदी आणि परदेश प्रवास पुढे ढकलणे यासारख्या उपाययोजनांचे आवाहन केले होते, जेणेकरून अर्थव्यवस्था मजबूत करता येईल. केंद्र सरकार लोकांना पश्चिम आशियातील संघर्षाच्या प्रतिकूल प्रभावापासून वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, यावर भर दिला होता.

अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या वित्तीय सेवा विभागाने सार्वजनिक क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्या, वित्तीय संस्थांना जारी केलेल्या परिपत्रकात प्रवासावरील खर्च कमी करण्याचे आणि इलेक्ट्रिक वाहने स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

काटकसरीचे उपाय तातडीने लागू केले जातील, असे वित्तीय सेवा विभागाने या परिपत्रकात म्हटले आहे. विशेष गरज असल्याशिवाय सर्व बैठका, आढावा आणि सल्लामसलत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारेच केली जावी, असे यात नमूद करण्यात आले आहे. बँका आणि वित्तीय संस्थांचे अध्यक्ष, एमडी, सीईओ आणि पूर्णवेळ संचालकांचे परदेश प्रवास विहित मर्यादेपेक्षा कमी ठेवले जावेत आणि अशा कार्यक्रमांना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थिती लावली जावी, असेही म्हटले आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या संदर्भात परिपत्रकात म्हटले आहे कि, सर्व संस्थांनी त्यांच्याद्वारे भाड्याने घेतलेल्या पेट्रोल आणि डिझेल कार शक्य तितक्या प्रमाणात इलेक्ट्रिक कारने बदलण्याचे उद्दिष्ट ठेवावे.

विद्यमान वाहनांचा ताफा टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतरित केला जावा, असे यात नमूद केले आहे.



### उद्योगांना उत्पादन वाढवण्याचे आवाहन

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सोमवारी उद्योगांना अशा वस्तू शोधण्याचे आवाहन केले ज्यांचे भारतात उत्पादन केले जाऊ शकते, जेणेकरून त्या उत्पादनांवरील आयातीचे अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. त्यांनी निर्यात वाढवण्याचा आणि वस्तू आयात करण्याऐवजी भारतात तयार झालेल्या वस्तू खरेदी करण्याचा सल्लाही दिला. देशांर्गत व्यापाऱ्यांना संबोधित करताना ते म्हणाले, कोणत्या वस्तूंची आयात केली जात आहे यावर तुम्ही लक्ष ठेवले पाहिजे, भारतात कोणत्या गोष्टींचे उत्पादन केले जाऊ शकते, यामध्येही तुम्हाला संधी दिसून येतील. गोयल यांनी भागधारकांना वाणिज्य मंत्रालयाच्या व्यापार पोर्टलद्वारे आयातीच्या ट्रेंडचा अभ्यास करण्याचे आणि देशांर्गत उत्पादन तसेच आयात पर्यायीकरणासाठी संधी शोधण्याचे आवाहन केले.

### पंतप्रधान मोदींच्या आवाहनानंतर सरकारी विभागाचा पुढाकार

पंतप्रधानांनी १० मे रोजी इंधनाचा योग्य वापर करणे, सोने खरेदी आणि परदेश प्रवास पुढे ढकलणे यासह इतर उपाययोजनांचे आवाहन केले होते. पश्चिम आशियातील संकटामुळे परकीय चलन वाचवण्यासाठी त्यांनी पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करणे, शहरांमध्ये मेट्रो रेल्वे सेवा वापरणे, कार पूलिंग करणे, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे, पार्सल वाहतुकीसाठी रेल्वे सेवांचा वापर करणे आणि वर्क फ्रॉम होम करणे यांसारखे सल्ले दिले होते. परकीय चलन वाचवण्याच्या गरजेवर भर देत मोदी यांनी सोने खरेदी आणि परदेश प्रवास एक वर्षासाठी पुढे ढकलण्याचे आवाहन केले होते. मोदींच्या या आवाहनानंतर सरकारी विभाग आणि राज्य सरकारांनी काटकसरीच्या उपायाचे आवाहन केले.

# चालू खात्यातील तूट वाढणार

**मुंबई :** भारताची चालू खात्यातील तूट आर्थिक वर्ष २०२६ मधील ०.९ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२७ मध्ये देशाच्या एकूण जीडीपीच्या २.३ टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे, असे एका परदेशी ब्रोकरेज संस्थेने सोमवारी सांगितले.

चालू आर्थिक वर्षात देशाचा व्यवहार तोल वाढून ६५ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचण्याचा अंदाज आहे, जो मागील आर्थिक वर्षात ३५ अब्ज अमेरिकन डॉलर होता, असेही यात म्हटले आहे.

एचएसबीसीने सांगितले की, त्यांनी कच्च्या तेलाची सरासरी किंमत ९५ डॉलर प्रति बॅरल गृहीत धरली आहे; आणि तेल, सोने, मुख्य वस्तू, सेवा व्यापार व रेमिटन्स (परदेशातून येणारा पैसा) यांच्या संवेदनशीलतेचा ताळमेळ घालून आर्थिक वर्ष २०२७ मध्ये चालू खात्यातील तूट जीडीपीच्या २.३ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे, जो आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ०.९ टक्के होता.

पोर्टफोलिओ इनफ्लो (गुंतवणूक प्रवाह), एफडीआय प्रवाह आणि बाह्य व्यावसायिक कर्जमधील ट्रेंडचा अभ्यास केल्यानंतर व्यवहार तोलचा हा अंदाज वर्तवण्यात आला आहे, असे अहवालात म्हटले आहे.



# खत अनुदानाचा खर्च ७०,००० कोटींवर

## खतांच्या वाढत्या आयात खर्चाचा फटका

**नवी दिल्ली :** सध्या सुरू असलेल्या पश्चिम आशिया संकटामुळे युरिया आणि इतर खतांच्या वाढत्या आयात खर्चामुळे, २०२६-२७ या वर्षातील सरकारचा खत अनुदानाचा खर्च ७०,००० कोटी रुपयांनी वाढून २.४१ लाख कोटी रुपयांवर पोहोचू शकतो, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सोमवारी दिली.

पश्चिम आशियातील घडामोडींवर आयोजित आंतर-मंत्रालयीन बैठकीदरम्यान खत विभागाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा एस. शर्मा म्हणाल्या, अनुदानाचा खर्च नक्कीच वाढेल, परंतु तो किती टक्क्यांनी वाढेल हे मी आताच सांगू शकत नाही. ही वाढ ७०,००० कोटी रुपयांपर्यंत असू शकते का, असे विचारले असता त्या म्हणाल्या, कदाचित असू शकते. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात खत अनुदानासाठी १.७१ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

खर्चाचा दबाव असूनही, शर्मा यांनी सांगितले की, २०२६ च्या खरीप हंगामासाठी खतांची उपलब्धता 'समाधानकारक' आहे. एकूण ३९० लाख टनाच्या गरजेपैकी ५१ टक्क्यांहून अधिक साठा सध्या उपलब्ध असून, उर्वरित टंचाई विविध देशांमधून आयात करून भरून काढली जात आहे. सध्या खतांचा एकूण साठा २००.९ लाख टन आहे, असे त्यांनी सांगितले.

उत्पादनात थोडी घट झाली आहे, जी आगामी महिन्यांत भरून काढली जाईल अशी आम्हाला आशा आहे, असे शर्मा यांनी नमूद केले. तसेच, युरिया प्लांटसाठी पुरेसा गॅस पुरवठा उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.



देशांतर्गत उत्पादन दररोज साधारणपणे ८०,००० टन इतके होत असून, पश्चिम आशिया संकट सुरु झाल्यापासूनचे उत्पादन ८६.२ लाख टन राहिले आहे - जे मागील वर्षाच्या याच कालावधीतील ९३ लाख टनांपेक्षा थोडे कमी आहे.

### भारतीय अन्न महामंडळ उभारणार अल्पमुदतीचे कर्ज

भारतीय अन्न महामंडळ तीन महिन्यांच्या कालावधीसाठी शेड्युल्ड बँकांकडून ५०,००० कोटी रुपयांचे अल्पमुदतीचे कर्ज उभारणार आहे, ज्यामध्ये अतिरिक्त २५,००० कोटी रुपये उभारण्यासाठी 'ग्रीन शू' पर्याय उपलब्ध असेल, अशी माहिती एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सोमवारी दिली. अन्नधान्याची खरेदी आणि वितरणातून निर्माण होणाऱ्या रोख प्रवाहातील तफावत दूर करण्यासाठी हा निधी उभारला जात आहे. या संदर्भात सादर करण्यात आलेल्या निविदा २२ मे रोजी उघडल्या जातील. निविदेंतर्गत एकूण कर्ज कोणत्याही परिस्थितीत ७५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त होणार नाही, असेही अधिकाऱ्याने सांगितले. हे अल्पमुदतीचे कर्ज असुरक्षित असेल. एफसीआयला अन्न पतपुरवठ्यासाठी उपलब्ध असलेली भारत सरकारची ६,००० कोटी रुपयांची हमी या कर्जासाठी लागू असणार नाही. निविदेच्या अटींनुसार, ऑफर्स ३१ ऑगस्टपर्यंत वैध असणे आवश्यक आहे आणि एफसीआयच्या कामकाजाच्या गरजेनुसार कर्जाचे वितरण टप्प्याटप्प्याने केले जाईल.

### भारतासमोर सायबर हल्ले, धोक्यांचे वाढते संकट...

**नवी दिल्ली :** भारतातील वाढते भू-राजकीय तणाव, वेगाने विस्तारत असलेले औद्योगिक क्षेत्र आणि झपाट्याने होणारे शहरीकरण यामुळे देश सायबर हल्ले तसेच रासायनिक, जैविक, किरणोत्सर्गी आणि अणु (सीबीआरएन) धोक्यांसाठी अधिक संवेदनशील बनत असल्याचा इशारा एका अहवालात देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारताने सीबीआरएन सुरक्षा धोरण तातडीने अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

हा सीबीआरएन संरक्षण आणि जोखीम-नियंत्रण उपायांवरील अहवाल सोमवारी येथे आयोजित पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री परिषदेत सादर करण्यात आला.

अहवालात म्हटले आहे की, सीमावाद, शेजारी देशांकडून वाढणारे सुरक्षा धोके, बदलती युद्धतंत्रे यामुळे सीबीआरएन युद्ध किंवा प्रॉक्सी हल्ल्यांचा धोका वाढत आहे.

प्रादेशिक तणाव वाढत असताना भारताने अधिक सज्ज आणि सक्षम प्रतिसाद प्रणाली उभारणे आवश्यक आहे, असे निरिक्षण अहवालात नोंदविले आहे.

**सीबीआरएन :**

C - Chemical (रासायनिक)
B - Biological (जैविक)
R - Radiological (किरणोत्सर्गी)
N - Nuclear (अणु)
सीबीआरएन धोक्यांमध्ये विषारी रसायने, जैविक हल्ले, किरणोत्सर्गी पदार्थांचा वापर आणि अण्वस्त्रांशी संबंधित संकटांचा समावेश होतो.

# सोन्याचे दर स्थिर

## आयात निर्बंधाने चांदीच्या दरात वाढ

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय राजधानीत सोमवारी सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम १.६२ लाख रुपयांवर स्थिर राहिले, तर पांढऱ्या धातूच्या (चांदीच्या) आयातीवरील नवीन निर्बंध आणि रुपयातील कमकुवतपणामुळे चांदीचे दर प्रति किलो २.७६ लाख रुपयांपर्यंत वधारले.

ऑल इंडिया सराफा असोसिएशनच्या मते, चांदीचा दर शुक्रवारच्या २,७५,००० रुपये प्रति किलोच्या बंद पातळीवरून १,००० रुपयांनी वाढून २,७६,००० रुपये प्रति किलो (सर्व करांसह) झाला आहे. असोसिएशनच्या माहितीनुसार, सराफा बाजारात ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,६२,८०० रुपयांवर अपरिवर्तित राहिला.

विश्लेषकांनी सांगितले की, जागतिक बाजारपेठेतील मंदीनंतरही देशांतर्गत सराफा बाजारातील किमती तुलनेने स्थिर राहिल्या.

मौल्यवान धातूंवर उच्च कस्टम ड्युटी (सीमा शुल्क) लागू केल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच, सरकारने शनिवारी चांदीच्या आयातीवर निर्बंध लादले आहेत.

ही आयात परवाना प्रणालीच्या कक्षेत आणली आहे. सरकारने १३ मे रोजी सोने आणि चांदी या मौल्यवान धातूंवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून वाढवून १५ टक्के केले होते.

प्रभावी शुल्क (३ टक्के आयजीएसटीसह) १८ टक्क्यांहून अधिक आहे. गरज नसलेल्या वस्तूंच्या आयातीवर नियंत्रण ठेवून परकीय चलनाची होणारी घसरण रोखण्यासाठी हे शुल्क वाढवण्यात आले होते.



### जागतिक दरउतार

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पॉट गोल्ड प्रति औंस ४,५३५.२३ अमेरिकन डॉलरवर किरकोळ घसरणीसह व्यवहार करत होते, तर चांदी १ टक्क्याने घसरून ७५.४२ अमेरिकन डॉलर प्रति औंसवर आली.

# शेअर बाजार किरकोळ वाढीसह बंद

## सत्रांतर्गत घसरणीतून आयटी समभागांनी तारले

**मुंबई :** सत्रंतर्गत व्यवहारात मोठ्या घसरणीचा सामना केल्यानंतर आयटी आणि निवडक ब्लू-चिप समभागांमधील मूल्य-आधारित खरेदी पाठिंब्यामुळे प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी सोमवारी किंचित वाढीसह बंद झाले.

अमेरिकन डॉलरच्या तुलनेत कमकुवत झालेला रुपया आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या वाढत्या जागतिक किमतींनी या वाढीवर मर्यादा आणल्या, असे व्यापाऱ्यांनी सांगितले.

अत्यंत चढ-उतारांच्या व्यवहारात, ३० शेअर्सचा बीएसई सेन्सेक्स ७७.०५ अंकांनी (०.१० टक्के) वाढून ७५,३१५.०४ वर बंद झाला. व्यवहारादरम्यान तो १,१३४.७८ अंकांनी घसरून ७४,१८०.२६ वर आला होता, तर एनएसई निफ्टी ६.४५ अंकांनी (०.०३ टक्के) वधारून २३,६४९.९५ वर बंद झाला.

सेन्सेक्समधील कंपन्यांमध्ये टेक महिंद्रा, इन्फोसिस, भारती एअरटेल, बजाज फिनसर्व्ह, सन फार्मा, एचसीएल टेक, बजाज फायनान्स आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस हे प्रमुख नफा मिळवणारे समभाग होते. याउलट, टाटा स्टील, पॉवर ग्रिड, स्टेट बँक ऑफ इंडिया, एनटीपीसी यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला.

आशियाई बाजारपेठांमध्ये, जपानचा बेंचमार्क निक्केई, शांघायचा एसएसई कंपोझिट निर्देशांक आणि हाँगकाँगचा हँग सेंग घसरणीसह बंद झाले, तर दक्षिण कोरियाचा बेंचमार्क कोस्पी सकारात्मक पातळीवर बंद झाला. युरोपातील बाजार संमिश्र पातळीवर व्यवहार करत होते. शुक्रवारी अमेरिकन बाजार १ टक्क्यांहून अधिक घसरणीसह बंद झाले होते.

परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी शुक्रवारी १,३२९.१७ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले. शुक्रवारच्या सत्रात सेन्सेक्स ०.२१ टक्क्यांनी घसरून ७५,२३७.९९ वर बंद झाला होता, तर निफ्टी ०.१९ टक्क्यांनी घसरून २३,६४३.५० वर बंद झाला होता. परिणामी त्याची सलग दोन दिवसांची वाढीची मालिका खंडित झाली होती.



### भारती एअरटेलने पटकावले दुसरे स्थान

भारती एअरटेलने सोमवारी इंट्रा-डे ट्रेडमध्ये काही काळासाठी एचडीएफसी बँकेला मागे टाकत मार्केट कॅपिटलायझेशननुसार (बाजार भांडवल) देशातील दुसरी सर्वात मौल्यवान कंपनी बनण्याचा मान मिळवला. मात्र, नंतर हे स्थान गमावून कंपनीने एकूण बाजार भांडवलाच्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर दिवसाचा समारोप केला. बीएसईवर भारती एअरटेलचे शेअर्स इंट्रा-डे ट्रेडमध्ये २.५९ टक्क्यांनी वधारून १,९५३.९५ रुपयांवर पोहोचले होते. त्यानंतर, हा शेअर १.७६ टक्क्यांच्या वाढीसह १,९३८.१० रुपयांवर बंद झाला. कंपनीच्या समभागांमधील तेजीचा हा सलग चौथा दिवस होता.

# रुपया ९६.३५ च्या ऐतिहासिक पातळीखाली

**मुंबई :** सुरू असलेल्या भू-राजकीय तणावामुळे कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि मजबूत डॉलरच्या दबावाखाली, सोमवारी भारतीय रुपया आणखी कमकुवत झाला आणि अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९६.३५ या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर बंद झाला.

विदेशी मुद्रा व्यापाऱ्यांनी सांगितले की, अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारपेठेतील भावना मंदीच्या राहिल्या आहेत. शिवाय, भारतासह उदयोन्मुख बाजारपेठेतील अर्थव्यवस्थांवर कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा दबाव कायम आहे; कारण वाढलेल्या दरांमुळे अमेरिकन डॉलरचा बाहेर जाणारा प्रवाह वाढतो, तसेच एफपीआयमुळे आधीच डॉलर बाहेर जात आहेत, असे व्यापाऱ्यांनी सांगितले.

आंतरबँक परकीय चलन बाजारात, रुपया ९६.१९ वर उघडला, त्यानंतर तो अमेरिकन डॉलरच्या तुलनेत आणखी घसरून ९६.३९ वर पोहोचला. ही घसरण मागील बंदच्या तुलनेत ५८ पैशांची होती. सोमवारच्या ट्रेडिंग सत्राच्या शेवटी, रुपया त्याच्या मागील बंदच्या तुलनेत ५४ पैशांनी घसरून ९६.३५ वर बंद झाला.

यापूर्वी शुक्रवारी, भारतीय रुपया ९६ प्रति डॉलरच्या पातळीच्या खाली घसरला होता आणि त्यानंतर अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९५.८१ या आतापर्यंतच्या सर्वात नीचांकी पातळीवर बंद झाला होता.

सहा प्रमुख चलनांच्या तुलनेत डॉलरची मजबुती मोजणारा डॉलर निर्देशांक, इराणमधील तणावामुळे ०.१४ टक्क्यांनी घसरून ९९.१४ वर व्यवहार करत होता.



**ब्रेंट क्रूड ०.७३ टक्क्यांनी वाढून ११०.१ अमेरिकन डॉलर प्रति बॅरलवर व्यापार करत होते.**

### क्षेत्रात १८५ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक; जानेवारी-मार्चमध्ये ५८ टक्क्यांची झेप

# हॉटेल व्यवसाय वाढीवर गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास

**नवी दिल्ली :** भारतातील हॉटेल क्षेत्रात जानेवारी-मार्च तिमाहीत १८५ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक झाली असून, वार्षिक ५८ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. हॉटेल व्यवसायातील दीर्घकालीन वाढीच्या संधींवर गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास हे यामागील प्रमुख कारण असल्याचे रिअल इस्टेट सल्लागार संस्था जेएलएलने स्पष्ट केले आहे.

मागील वर्षी याच कालावधीत ११७ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक झाली होती.

देशांतर्गत पर्यटन, व्यावसायिक प्रवास, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आणि विमानतळाभोवती विकसित होणाऱ्या नव्या व्यावसायिक केंद्रांमुळे भारतातील हॉटेल उद्योगात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीची संधी निर्माण होत आहे. त्यामुळे आगामी काळातही या क्षेत्रात सकारात्मक वाढ कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**अहवाल काय सांगतो?**

सोमवारी जेएलएल इंडियाने 'हॉटेल इन्व्हेस्टमेंट ट्रेंड्स इन इंडिया : २०२५' हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, २०२५ या कॅलेंडर वर्षात भारताच्या हॉटेल क्षेत्रातील गुंतवणुकीत ६७ टक्क्यांची वाढ झाली होती आणि ती ५६७ दशलक्ष डॉलरवर पोहोचली होती. हीच सकारात्मक गती २०२६ च्या पहिल्या तिमाहीतही कायम राहिल्याचे दिसून आले.

२०२६ च्या पहिल्या तिमाहीत व्यवहारांमध्ये वाढ झाली आहे. २०२५ मधील गुंतवणुकीच्या वेगामुळे एकूण व्यवहारमूल्य १८५ दशलक्ष डॉलरपर्यंत पोहोचले, जे मागील वर्षाच्या तुलनेत ५८ टक्क्यांनी अधिक आहे.

जानेवारी-मार्च तिमाहीत वॉरबर्ग पिंकसने फ्ल्युर हॉटेल्समध्ये ४१ टक्के हिस्सा विकत घेतला. फ्ल्युर हॉटेल्स ही लेमन ट्री हॉटेल्सची उपकंपनी आहे. कंपनीने स्वमालकीच्या हॉटेल विस्तारासाठी १०७ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक करण्याची घोषणा केली.



### भारतातील हॉटेलमधील गुंतवणूक :

| | |
|---|---|
| जानेवारी-मार्च २०२६ गुंतवणूक | १८५ दशलक्ष डॉलर |
| ■ वाढ | ५८ टक्के |
| ■ जानेवारी-मार्च २०२५ गुंतवणूक | ११७ दशलक्ष डॉलर |
| ■ २०२५ मधील एकूण गुंतवणूक | ५६७ दशलक्ष डॉलर |
| ■ २०२४ मधील गुंतवणूक | ३४० दशलक्ष डॉलर |
| ■ २०२५ मधील व्यवहार | २८ |
| ■ नव्याने सुरू झालेली ब्रँडेड हॉटेल्स | ३ |
| ■ नव्या रूम | ८,९९० |
| ■ २०२५ मधील स्थिती | ४२४ हॉटेल, ५१,६४७ रूम |

आपला आवाज. आपली शक्ती
जनशक्ति विशेष





# सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटींचा निधी मंजूर

## तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समिती बैठकीत निर्णय

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटी ७२ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला. यामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असून भाविक, पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत. तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार आणि कालमर्यादेत पूर्ण करण्याचे तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासासाठी १७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या विकास आराखड्यांतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. वाहतूककोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आदी योजना हाती घेण्याची सूचना फडणवीस यांनी बैठकीत केली. दरम्यान, संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी ४१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अगरवाल उपस्थित होते.



■ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी २१०.४५ कोटी प्रस्तावित करण्यात आले असून यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे.



■ संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे.



■ श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण केली जाणार आहेत.




### अजिंक्यतारासाठी १३४ कोटी

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रुपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग आणि लँडस्केपिंग, राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरुजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे, अत्याधुनिक लटकता पूल, स्वच्छता आणि विश्रांतीगृहांची कामे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पार पाडावीत, असे फडणवीस यांनी सांगितले.

## निवडक

### एलएलएम सीईटीला अंतिम मुदतवाढ

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी घेण्यात येणाऱ्या एलएलएम कॉमन एंट्रान्स टेस्ट (एलएलएम सीईटी) परीक्षेच्या प्रवेश अर्जास आज मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार १९ मे रोजी रात्री ११ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल. या ऑनलाइन प्रवेश परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज केले नाहीत किंवा ज्यांचे अर्ज अपूर्ण राहिले आहेत अशा इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर 'Online LL.M. CET Exam-2026-27' येथे क्लीक करून ऑनलाईन अर्ज सादर करायचे आहेत. एल.एल.एम. कॉमन एंट्रान्स टेस्ट (एलएल.एम. सीईटी) परीक्षेसाठी ही अंतिम मुदतवाढ असून यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

### धारावीत अग्निभडका; अनेक गाळे जळून खाक

**मुंबई :** धारावीतील अशोक मिल कंपाऊंड परिसरात रविवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास तळ अधिक तीन मजली इमारतीत आग लागल्याची घटना घडली. काही वेळात आग वाऱ्यासारखी पसरली आणि परिसरात धुराचे लोट पसरले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर रात्री ३ वाजण्याच्या सुमारास नियंत्रण मिळवले. दरम्यान, या घटनेत कोणीही जखमी झाले नसल्याची माहिती मुंबई महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली. धारावी अशोक मिल कंपाऊंड, ९० फिट रोड, लक्ष्मी मेडिकल स्टोअर्स येथे तळ अधिक तीन मजली इमारत आहे. या ठिकाणी रविवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास एका गाळ्यात शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. काही वेळात आग वाऱ्यासारखी पसरली आणि परिसरात धुराचे लोट पसरले.

### गेट वे बस मार्ग सुरूच राहणार

**मुंबई :** लाखो प्रवासी आणि पर्यटकांना मोठा दिलासा देत बेस्ट उपक्रमाने गेट वे ऑफ इंडियाकडे जाणारे बस मार्ग ए-११२ आणि ए-११६ बंद न करण्याचा निर्णय घेतला आहे. बेस्ट समितीच्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा झाली, परंतु सर्वपक्षीय सदस्यांनी याला तीव्र विरोध केल्यामुळे हा प्रस्ताव तूर्तास गुंडाळून ठेवण्यात आला आहे. हे दोन्ही बस मार्ग चर्चगेट आणि सीएसएमटी या प्रमुख स्थानकांना गेट वे ऑफ इंडियाशी जोडतात. एलिफंटा, मांडवा, उरण आणि अलिबाग येथे बोटीने जाण्यासाठी प्रवाशांकडून या मार्गांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

### ऑनलाइन औषध विक्रीविरोधात केमिस्टचा उद्या देशव्यापी संप

**मुंबई :** बेकायदेशीर ऑनलाइन औषध विक्री (ई-फार्मसी) आणि बड्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून सुरू असलेल्या अनैतिक व्यावसायिक स्पर्धेच्या निषेधार्थ देशभरातील औषध विक्रेत्यांनी आक्रमक पाऊल उचलले आहे. बुधवार, २० मे रोजी देशभरात कडकडीत बंद पुकारण्यात आला असून यामध्ये देशातील तब्बल १२.५० लाख आणि महाराष्ट्रातील सव्वा लाख औषध विक्रेते पूर्ण ताकदीने उतरणार आहेत.

'ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स' आणि 'महाराष्ट्र स्टेट केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशन' या संघटनांनी या आंदोलनाची अधिकृत घोषणा केली आहे. महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल नावंदर यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

# माझगावमध्ये स्कील डेव्हलपमेंट सेंटर, ईस्ट इंडियन वस्तुसंग्रहालय

**मुंबई :** युवकांसाठी स्कील डेव्हलपमेंट सेंटर, ईस्ट इंडियन समाजाचा समृद्ध इतिहास आणि संस्कृती दर्शवणारे ईस्ट इंडियन वस्तुसंग्रहालय, लहान मुलांना खेळण्यासाठी जागा अशा विविध सोयीसुविधांनी माझगावमधील काका जोसेफ बाप्तिस्ता उद्यान पर्यटकांसाठी सज्ज झाले आहे.

मुंबईतील ईस्ट इंडियन समाज येथील आगरी-कोळी यांच्याप्रमाणे मूळ निवासी आहे. काका जोसेफ बाप्तिस्ता (१८६४ ते १९३०) या समाजाचे गौरवस्थान आहे. लोकमान्य टिळकांचे ऐतिहासिक घोषवाक्य 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे' याचे निर्माते म्हणून काका जोसेफ बाप्तिस्ता यांना ओळखले जातात. लोकमान्य टिळक व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे वकील म्हणून न्यायालयात धडाडीने बाजू मांडणारे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील नामवंत सेनानी काका जोसेफ बाप्तिस्ता यांच्या नावाने हे उद्यान ओळखले जाते. या उद्यानात ईस्ट इंडियन भवनचे उद्घाटन भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या विकासनिधीतून हा प्रकल्प साकारण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी मोबई गावठण पंचायतचे मुख्य नेतृत्व असलेले ग्लिसन बरेटो, अल्फी डिसुझा आणि पंचायतचे सर्व विश्वस्त यांचे मोठे योगदान आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणाऱ्या या महान क्रांतिकारकाला हे उद्यान आणि भवन आदराने समर्पित करण्यात येत आहे, अशी भावना आमदार अमित साटम यांनी व्यक्त केली. या उद्घाटन सोहळ्याला ईस्ट इंडियन समाजातील व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### काका जोसेफ बाप्तिस्ता उद्यानात सोयीसुविधा



### अत्याधुनिक सुविधा

राज्य सरकारच्या आर्थिक पाठबळातून या देखण्या वास्तू उभ्या राहिल्या आहेत. या वास्तूमध्ये नागरिक आणि लहान बालकांसाठी अत्याधुनिक सुविधा आहेत. काका जोसेफ बाप्तिस्ता यांचा भव्य पुतळा असून बालकांसाठी खेळण्याची जागा, ईस्ट इंडियन समाजाचा समृद्ध इतिहास आणि संस्कृती दर्शवणारे 'ईस्ट इंडियन वस्तुसंग्रहालय' आणि युवकांसाठी 'स्कील डेव्हलपमेंट सेंटर' तसेच सामाजिक व कौटुंबिक समारंभासाठी हवेशीर मांडव उभारण्यात आला आहे.



अंधेरी वृत्तपत्र विक्रेता सेना आणि नवकिरण मंडळाच्यावतीने अंधेरी आणि आसपासच्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या मुलांचा रोख रक्कम, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विविध वृत्तपत्र समूहाचे वरिष्ठ अधिकारी, बृहन्मुंबई वृत्तपत्र संघाचे कार्याध्यक्ष मधुसूदन सदडेकर, खजिनदार रवींद्र चिले, रवी संसारे, अबोध शिर्के, एस. मुरुगन, हरेश भेदा, शशी शिर्के, अँथोनी, राजन यादव, शैलेश कदम, संतोष निंबाळकर, राजेश देसाई यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवान विद्यार्थी प्रगती यादव, समर्थ निंबाळकर, सोहम कदम, श्रेया कदम, दिव्या यादव, सूरज यादव, कृष्णा धोबी, निखिल यादव, वैभवी यादव, सुमित यादव, दिशा देसाई, तनया माने यांना गौरवण्यात आले.

# एसआरएच्या रखडलेल्या योजना मार्गी लागणार!

**मुंबई :** सर्वांना हक्काचे घर मिळावे ही केंद्र व राज्य शासनाची भूमिका आहे. झोपडपट्टीमुक्त मुंबई आणि प्रत्येक गरीब कुटुंबाला सुरक्षित, दर्जेदार आणि सन्मानाने जगता येईल असे घर मिळवून देणे हा शासनाचा निर्धार आहे. यासाठी विविध ठिकाणी समस्या निराकरण शिबिर घेण्यात येतील. झोपडपट्टीवासीयांना लवकरात लवकर घरे मिळावीत आणि रखडलेल्या योजना वेगाने पूर्ण व्हाव्यात, यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सीईओ डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी व्यक्त केला.

> झोपडपट्टी धारकांची बायोमेट्रिक समस्या, प्रलंबित भाडे तत्काळ देणे यासह झोपडपट्टीधारकांचे जीवनमान उंचावण्यासाठी रविवारी एसआरए जनता दरबार घेतला. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून एसआरए योजनेतील रहिवाशांच्या समस्यांचे १५ दिवसांत निराकरण करावे.
> - **रवींद्र वायकर**, खासदार, शिवसेना

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील झोपडधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेतून तसेच खासदार रवींद्र वायकर यांच्या पुढाकाराने व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या साहाय्याने आरे कॉलनी येथे आयोजित एसआरए 'जनता दरबार' घेण्यात आला. यात २ हजारांपेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला. यातील ६० सोसायटीच्या योजनांच्या रहिवाशांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या वर्सोवा, अंधेरी (पूर्व व पश्चिम), गोरेगाव (पूर्व व पश्चिम), जोगेश्वरी (पूर्व व पश्चिम), दिंडोशी (पूर्व व पश्चिम), मालाड (पूर्व व पश्चिम) येथील झोपडीधारकांचा एसआरएच्या माध्यमातून पुनर्विकास करताना निर्माण होणाऱ्या शंकांचे एसआरएकडून सर्व प्रकारे समाधान करण्यात आले आहे.

### सीईओ महेंद्र कल्याणकर यांची ग्वाही

### यावर झाली चर्चा

- ■ झोपडीधारकांची बायोमेट्रिक विषयक समस्यांचे निराकरण,
- ■ प्रलंबित भाडे तक्रारी निकाली काढून भाडे प्रदान करणे,
- ■ झोपडीधारकांची पात्रताविषयी तक्रारींचे निवारण,
- ■ सदनिका वाटपाची प्रकरणे निकाली काढणे,
- ■ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची सद्यास्थितीची माहिती देणे व तक्रारींचे निवारण करणे,
- ■ महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.पु) आधी १९७१ मधील कलम ३३ खालील कार्यवाही करणे या विषयावर मार्गदर्शन करण्यात आहे.

# थकीत मेंटेनन्सच्या पैशांची वसुली अनेक वर्षांनंतरही केली जाऊ शकते!

## उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**मुंबई :** सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांचे थकीत मेंटेनन्स शुल्क हे सतत राहणारे दायित्व आहे. अनेक वर्षांनंतरही मेंटेनन्सच्या शुल्काची कायदेशीर वसुली केली जाऊ शकते, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने देत ठाण्यातील दोन ज्येष्ठ नागरिकांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. यामुळे वर्षानुवर्षे मेंटेनन्स शुल्क न भरणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याचा सोसायट्यांचा मार्ग मोकळा झाला. ठाण्यातील ज्येष्ठांनी मेंटेनन्स वसुलीच्या कारवाईला आव्हान दिले होते.



### मेंटेनन्सची थकबाकी देण्यास नकार

याचिकाकर्ते रहिवासी १९९६ पासून नोंदणीकृत न केलेल्या विकास कराराच्या आधारे संबंधित फ्लॅटमध्ये राहत होते. त्यांनी थकीत मेंटेनन्सची रक्कम भरण्यास नकार दिला होता. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी सविस्तर सुनावणी घेतली आणि निर्णय दिला.

### सुविधा घेत असाल तर मेंटेनन्स भरावाच लागेल!

महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम १५४बी-२९ अंतर्गत सोसायट्यांच्या थकबाकी वसुलीसाठी विशेष यंत्रणा आहे. यासाठी सामान्य कालमर्यादेचे नियम लागू होत नाहीत. त्यामुळे १० ते १५ वर्षांपूर्वीचे जुने मेंटेनन्स शुल्कही वसूल केले जाऊ शकते. एखादी व्यक्ती फ्लॅटची अधिकृत नोंदणीकृत मालक नसली, तरी ती जर त्या फ्लॅटमध्ये राहत असेल व कर भरत असेल आणि सोसायटीच्या सोयी-सुविधांचा लाभ घेत असेल, तर तिला मेंटेनन्स भरावाच लागेल, अशी निरिक्षणे न्यायालयाने नोंदवली.



**'दि इंडियन डेन्टल असोसिएशन'चे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशन आणि नवशक्ति-दि फ्री प्रेस जर्नल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी 'फ्री प्रेस हाऊस' येथे दंत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा ४० हून अधिक जणांनी लाभ घेतला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी 'दि इंडियन डेन्टल असोसिएशन'चे जनसंपर्क अधिकारी वर्जिन मुन्शी, डॉ. तन्वी पाटील, डॉ. वंशिका पटेल, डॉ. शिवानी पांचाळ, डॉ. अराथी जोसेफ यांनी विशेष परिश्रम घेतले.**

### केंद्राच्या चुकीच्या धोरणांमुळे महागाई

**मुंबई :** अमेरिका- इराण युद्धामुळे महागाई वाढणार नाही तर त्यासाठी मोदी सरकारचे चुकीचे आर्थिक धोरण कारणीभूत असल्याची टीका काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली.

# सातारा सरकारी गोदामातील माथाडींना चार महिने वेतन नाही

## राज्यव्यापी आंदोलनाचा रामिष्टे यांचा इशारा

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील विविध शासकीय गोदामातील माथाडी कामगारांना गेल्या चार महिन्यात वेतन मिळाले नसून या कामगारांनी उपाशीपोटी काम करावे, अशी सरकारची अपेक्षा आहे का, असा तिखट सवाल अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सरचिटणीस तसेच भाजप कामगार मोर्चाचे वरिष्ठ उपाध्यक्ष अविनाश रामिष्टे यांनी केला आहे.

सातारा जिल्ह्यातील सरकारी गोदामातील माथाडी कामगार अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सभासद आहेत तसेच सातारा माथाडी असंरक्षित कामगार मंडळाकडे नोंदित आहेत. या कामगारांचे मासिक वेतन २० हजार रुपयांच्या आसपास आहे. मात्र, जानेवारी महिन्यापासून सलग गेले चार महिने त्यांना वेतन मिळालेले नाही. वास्तवात माथाडी अधिनियमन १९६९ मधील तरतुदीनुसार नोंदीत मालकाने प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेच्या आत कामगारांची मजुरी व लेवी यांचा भरणा माथाडी मंडळाकडे करणे आवश्यक असते.

### ...तर धान्य पुरवठा विस्कळीत होईल!

माथाडी कामगारांकडून करण्यात येत असलेले धान्याच्या पोत्यांच्या चढ-उताराचे काम अत्यावश्यक सेवेत येते. या कामगारांनी काम बंद केल्यास तालुका, जिल्हा पातळीवरील धान्य पुरवठा विस्कळीत होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर, या कामगारांनी आंदोलन करू नये, काम बंद केल्यास ते बेकायदेशीर ठरेल, असे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी संघटनेला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

**यकृताने गरजूला मिळाले जीवनदान; भारत-पाकिस्तान युद्धात बजावली होती सेवा**

# एका युद्धवीराचे अवयवदान

**अमित श्रीवास्तव/मुंबई**

भारत-पाकिस्तानमध्ये १९७१ साली झालेल्या युद्धातील माजी सैनिक अशोक चोपडे (७५) यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाने अवयवदानाचा कौतुकास्पद निर्णय घेतला. बांगलादेश मुक्ती युद्ध म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या युद्धात त्यांनी रिपोर्टिंग ऑफिसर म्हणून सेवा बजावली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या अवयवदानामुळे इतर व्यक्तींना नवीन जीवन मिळणार असून या माध्यमातून ते या जगात जिवंत राहणार आहेत. झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन कमिटीने (झेडटीसीसी) दिलेल्या माहितीनुसार, वर्ष २०२६ मधील मुंबईतील हे २५ वे मरणोत्तर अवयवदान ठरले आहे. राज्याच्या वितरण मार्गदर्शक तत्त्वांनुसार दिवंगत सैनिकाचे यकृत गरजू रुग्णाला दान करण्यात आले.

अशोक चोपडे यांचे सुपुत्र पवन चोपडे यांनी सांगितले की, त्यांच्या वडिलांना मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा त्रास होता; परंतु, इतर कोणतीही मोठी आरोग्य समस्या नव्हती. मात्र; ९ मे रोजी उलट्या झाल्यानंतर त्यांना चक्कर आणि थकवा जाणवू लागला. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; परंतु एमआरआय तपासणीत त्यांच्या मेंदूत रक्तस्त्राव (ब्रेन ब्लीड) झाल्याचे समोर आले. यामुळे त्यांच्या कवटीच्या आतील दाब (इंट्राक्रॅनिअल प्रेशर) वाढला होता. डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता फेटाळून लावली होती. त्यानंतर इतर डॉक्टरांचा आणि न्यूरोसर्जनचा सल्ला घेतला असता त्यांनीही तेच सांगितले. अखेर १७ मे च्या संध्याकाळी अशोक चोपडे यांचे निधन झाले.

> रुग्णालय प्रशासनाने चोपडे कुटुंबाला अवयवदानाचा सल्ला दिला होता. वेळ अत्यंत कमी असल्याने आम्ही कुटुंबात चर्चा केली आणि अवयवदानाचा निर्णय घेतला. त्यामुळेच आमचे वडील या पृथ्वीतलावरून गेल्यानंतरही इतरांच्या रूपात जिवंत राहणार आहेत.
> - **पवन चोपडे**, अशोक चोपडे यांचे पुत्र



### चोपडे मूळचे ठाण्याचे

चोपडे कुटुंब मूळचे ठाण्याचे रहिवासी आहे. अशोक चोपडे यांनी देशभरात सेवा बजावली; परंतु १९७१ च्या युद्धादरम्यान ते लखनऊ येथे रिपोर्टिंग ऑफिसर म्हणून तैनात होते. या युद्धामुळे तत्कालीन पूर्व पाकिस्तान स्वतंत्र होऊन बांगलादेश हा स्वतंत्र देश अस्तित्वात आला होता.

आपला आवाज. आपली शक्ती जनशक्ति
■ संस्थापक – **स्व. ब्रिजलालभाऊ पाटील**
■ संस्थापक संपादक – **स्व. कुंदनदादा दत्तात्रय ढाके**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक **योगेश्वर दत्तात्रय ढाके** यांनी भास्कर प्रिंटींग प्रेस, गट नं. २३८/२, कासट कम्पाउंड, पाळधी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथे मुद्रीत करुन ३, दुसरा माळा, रायसोनी चेंबर्स, चित्रा चौक, नवी पेठ, जळगाव-४२५००१(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ संपादक – **त्र्यंबक केदूजी कापडे*** » (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) ■ ई-मेल – **jalgaon@janashakti.in** ■ **स्थापना** : १९५६
■ **संपर्क** : संपादकीय – ९८२३४४८५४४, ■ व्यवस्थापकीय – ९५४५४७९९८९.